# अनुसूचित जमाती कल्याण समिती

## २०१०-२०११

## (बारावी महाराष्ट्र विधानसभा)

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील अनुसूचित जमातीच्या अधिकारी/कर्मचारी यांचे भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांच्याकरिता राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजना संबंधीचा अहवाल**

# पहिला अहवाल

सत्यमेव जयते

(हा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहाला
दिनांक ...२४ जुलै २०१०........ रोजी सादर करण्यात आला.)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**
विधान भवन, मुंबई
जुलै, २०१०.

# अनुसूचित जमाती कल्याण समिती

## २०१०-२०११

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील अनुसूचित जमातीच्या अधिकारी/कर्मचारी यांचे भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांच्याकरिता राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजना संबधीचा अहवाल

# पहिला अहवाल

एचबी १२०२—१

# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
# अनुसूचित जमाती कल्याण समिती
# २०१०-२०११

समिती प्रमुख

(१) श्री. सुरेश धस, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री.आनंदराव गेडाम, वि.स.स.

(३) श्री.रामरतनबापू राऊत, वि.स.स.

(४) श्रीमती निर्मला गावित, वि.स.स.

(५) श्री.राजाराम ओझरे, वि.स.स.

(६) श्री.जगदीशचंद्र जगदीशभाऊ वळवी, वि.स.स.

(७) श्री.किसन कथोरे, वि.स.स.

(८) श्री.उमाजी बोरसे, वि.स.स.

(९) ॲड.चिंतामण वनगा, वि.स.स.

(१०) श्री.दौलत दरोडा, वि.स.स.

(११) श्री.धनराज महाले, वि.स.स.

(१२) श्री.एम.एम.शेख, वि.प.स.

(१३) श्री.राजेंद्र मुळक, वि.प.स.

(१४) श्री.रमेश शेंडगे, वि.प.स.

(१५) श्री.परशुराम उपरकर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्री. म.मु.काज, उप सचिव

(३) श्री. ला.ना.जाधव, अवर सचिव (समिती)

(४) श्री. आनंद राहाटे, कक्ष अधिकारी

# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
# अनुसूचित जमाती कल्याण समिती
# २००८-२००९

(१) श्री.म.ना.बरोरा, वि.स.स. तथा मा.समितीप्रमुख

(२) श्री.तुकाराम बिरकड, वि.स.स.

(३) श्री.शशिकांत शिंदे, वि.स.स.

(४) श्री.रमेश चौधरी, वि.स.स.

(५) श्री.सुरेश इंगळे, वि.स.स.

(६) * रिक्त

(७) श्री.राजाराम ओझरे, वि.स.स.

(८) श्री.बबनराव घोलप, वि.स.स.

(९) श्री.बाळा नांदगावकर, वि.स.स.

(१०) डॉ. संदिप धुर्वे, वि.स.स.

(११) श्री.राजकुमार पटेल, वि.स.स.

(१२) श्री.एम.एम.शेख, वि.प.स.

(१३) श्री.दिलीपराव सोनावणे, वि.प.स.

(१४) श्री.वसंत पवार, वि.प.स.

(१५) श्री.परशुराम उपरकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्री. विजय दि.जोशी, उप सचिव

(३) श्री. ज्ञा.न.माहुरे, समिती अधिकारी

(४) श्री. दिलीप येवला, कक्ष अधिकारी

(*श्री. नितिन राऊत, वि.स.स. यांची मंत्रीपदी नियुक्ती झाल्याने सदर जागा रिक्त)

# प्रस्तावना

मी, अनुसूचित जमाती कल्याण समितीचा प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरुन समितीचा पहिला अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

समितीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कार्यालयातील अनुसूचित जमातीच्या अधिकारी व कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष याबाबत तसेच त्यांच्याकरिता राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांबाबत माहिती घेण्याचे ठरविले. त्यानुसार समितीने दिनांक २७ जानेवारी २००९ रोजी अकोला प्रादेशिक कार्यालय, दिनांक २७ फेब्रुवारी २००९ रोजी मुंबई प्रादेशिक कार्यालय, कुर्ला (मुंबई), दिनांक २ मार्च २००९ रोजी यवतमाळ प्रादेशिक कार्यालय, दिनांक २५ जून २००९ रोजी, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई सेंट्रल व दिनांक २ जुलै २००९ रोजी पुणे प्रादेशिक कार्यालय, **महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या** कार्यालयास प्रत्यक्ष भेट देऊन संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली. समितीला प्रश्नावलीच्या संदर्भात प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच प्रत्यक्ष भेटीच्या वेळी मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक ३ जून २०१० रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. प्रत्यक्ष भेटीच्या व साक्षीच्या वेळी मिळालेल्या माहितीवर सखोल विचार करून समितीने त्या संदर्भात नोंदविलेले आपले अभिप्राय व शिफारशी या अहवालात समाविष्ट केल्या आहेत.

विभागीय सचिवांनी तसेच इतर संबंधित अधिकाऱ्यांनी समितीस माहिती देऊन केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

समितीने प्रारुप अहवाल दिनांक १९ जुलै २०१० रोजीच्या बैठकीत विचारात घेतला व तो संमत केला.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : १९ जुलै २०१०.

**सुरेश धस,**
समिती प्रमुख,
अनुसूचित जमाती कल्याण समिती.

# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

## अहवाल

अनुसूचित जमाती कल्याण समितीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील अनुसूचित जमातीच्या अधिकारी /कर्मचारी यांच्या भरती, बढती, आरक्षण, अनुशेष, जात पडताळणी तसेच आदिवासी बहूल डोंगरी विभागात राज्य मार्ग परिवहन च्या बसेस चालविताना आदिवासी जमातीच्या लोकांचा फायदा कसा होईल याबाबत अकोला, यवतमाळ, मुंबई विभाग, रायगड, ठाणे, सिंधुदुर्ग, पुणे येथील राज्य मार्ग परिवहन महामंडळाअंतर्गत असलेल्या प्रादेशिक कार्यालयात बैठका घेण्यात आल्या आहेत.

समितीने महामंडळाच्या प्रादेशिक कार्यालयाकडे प्रश्नावली पाठवून प्रादेशिक कार्यालयात व मध्यवर्ती कार्यालयात झालेल्या बैठकीच्या वेळी प्रश्नावलीच्या अनुषंगाने समितीला महामंडळाकडून पुढील प्रमाणे माहिती प्राप्त झाली.

### अकोला प्रादेशिक कार्यालय

दिनांक २७ जानेवारी, २००९ रोजी अकोला येथे झालेल्या बैठकीच्या वेळी पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली :—

| अ. क्र | वर्ग | मंजूर पदे | | | एकूण भरलेली पदे. | | | रिक्त पदे | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | तांत्रिक, अतांत्रिक | सरळ सेवा | खात्या मार्फत | एकूण | सरळ सेवा | खात्या मार्फत | एकूण | सरळ सेवा | खात्या मार्फत | एकूण |
| १. | अतांत्रिक वर्ग-३ | २४३ | १२१ | ३६४ | १७३ | ६४ | २३७ | ७० | ५७ | १२७ |
| २. | तांत्रिक वर्ग-४ | २६० | - | २६० | २२१ | - | २२१ | ३९ | - | ३९ |
| ३. | अतांत्रिक वर्ग-४ | १३१ | - | १३६ | १०६ | २ | १०८ | २५ | ३ | २८ |
| ४. | चालक | ७७७ | - | ७७७ | ९०० | - | ९०० | - | - | +१२३ |
| ५. | वाहक | ७६४ | - | ७६४ | ९३० | - | ९३० | - | - | +१६६ |

उक्त मंजूर पदांपैकी अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी राखून ठेवण्यात आलेली पदे :—

| अ. क्र | वर्ग | अनुसूचित जमातीसाठी राखीव पदे | | | राखीव पदांपैकी भरलेली पदे | | | रिक्त पदे | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | तांत्रिक, अतांत्रिक | सरळ सेवा | खात्या- मार्फत | एकूण | सरळ सेवा | खात्या- मार्फत | एकूण | सरळ सेवा | खात्या मार्फत | एकूण एकूण |
| १. | अतांत्रिक | १९ | ८ | २७ | २१ | ६ | २७ | +२ | २ | - |
| २. | अतांत्रिक वर्ग-४ | ७ | - | ७ | ५ | - | ५ | २ | - | २ |
| ३. | चालक | ६८ | - | ६८ | +१२३ | - | +१२३ | ३ | - | ३ |
| ४. | वाहक | ६७ | - | ६७ | +१६६ | - | +१६६ | - | - | - |

अकोला विभागात काम करणाऱ्या अनुसूचित जमातीच्या कर्मचारी/अधिकारी यांच्या जातीच्या दाखल्याची पडताळणीची माहिती खालीलप्रमाणे.

एकूण कर्मचाऱ्यांची संख्या १६३, कागदपत्र सादर केलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या ५४, कागदपत्र सादर न केलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या १०९, वैध प्रमाणपत्रांची संख्या २४, अवैध प्रमाणपत्राची संख्या १४, अद्यापपर्यंत निर्णयप्राप्त न झालेल्या कर्मचाऱ्यांची/प्रमाणपत्रांची संख्या १६, अवैध दाखल्यावर केलेली कार्यवाही (संरक्षणप्राप्त) कर्मचाऱ्यांची संख्या ८, कमी केलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या ४, मा. न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांची संख्या २ अनुसुचित जमातीच्या कर्मचाऱ्यांनी अनुसुचित जमातीचा दावा सिद्ध करण्यासाठी कागदपत्रे सादर केलेली नाहीत म्हणून त्यांना कागदपत्रे सादर करण्याची सतत मागणी करण्यात येत आहे. तसेच मध्यवर्ती कार्यालयाने जात पडताळणी समितीकडे वैध / अवैधबाबत त्वरीत कार्यवाही करावी याकरीता सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे.

समितीने दिनांक २७ जानेवारी २००९ रोजी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, प्रादेशिक कार्यालय अकोला येथे प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने बैठक घेऊन संबंधित अधिकाऱ्यांसमवेत चर्चा केली.

समितीने मंजूर पदांपैकी वर्गनिहाय तांत्रिक/अतांत्रिक, चालक, वाहक यांची प्रत्येकी किती पदे अनुसूचित जमातींच्या उमेदवारांसाठी राखून ठेवण्यात आली आहेत. त्यांपैकी किती व कोणकोणती पदे भरण्यात आली आहेत व उर्वरित पदे रिक्त राहण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ? रिक्त पदे भरण्याबाबत आतापर्यंत काय कारवाई करण्यात आली आहे अशी विचारणा केली, त्यावर विभागीय नियंत्रक यांनी अनुसुचित जमातीसाठी राखीव पदे १८७ असून ३३९ पदे भरली आहेत. वर्ग -४ मध्ये अतिरिक्त पदे दिसत आहेत. ती अतिरिक्त पदे भरलेली नसून बदली होऊन आलेल्या चालक-वाहकांची ही संख्या आहे. तसेच चालकांची ६४ पदे अद्याप भरावयाची आहे. असे समितीला सांगितले.

त्यावर समितीने अशी विचारणा केली की, अनुसुचित जमातीसाठी १८७ पदे राखीव असल्याचे म्हटले आहे. त्यांपैकी चालकाची ६८ व वाहकाची ६७ असे एकूण १३५ पदांचे आरक्षण आहे. उर्वरित ५२ पदांच्या आरक्षणाबाबत काय परिस्थिती आहे. यावर विभागीय नियंत्रक , अकोला यांनी एकूण तांत्रिक तसेच अतांत्रिक आणि चालक, वाहक यांची अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेली अशी ३३९ पदे भरलेली आहेत. तसेच अकोला विभागात अनुसूचित जमातीचा अतांत्रिक संवर्गामध्ये खात्यामार्फत बढतीने भरावयाच्या २ पदांचा अनुशेष असून सदर पदे भरण्याच्यादृष्टीने खात्यामार्फत बढतीसाठी परीक्षेची कार्यवाही सुरू आहे आणि वर्ग ४ मध्ये अतांत्रिक मध्ये २ पदांचा अनुशेष आहे. सदरहू दोन पदे 'स्वच्छक' ची आहेत आणि स्वच्छक पदे भरण्यावर बंदी असल्याने हा अनुशेष भरता आला नाही असे समितीला सांगितले. समितीने या ठिकाणी दिलेल्या आकडेवारीनुसार आपल्याकडे चालक आणि वाहक या पदांमध्ये अनुसूचित जमातीसाठी १८७ पदे राखीव आहेत आणि त्यापैकी चालक पदाची ६८ पदे व वाहक पदाची ६७ पदे आपण भरली आहेत म्हणजे १३५ आरक्षित पदे भरली आहेत तर मग उरलेल्या ५७ पदांचा अनुशेष शिल्लक राहिला पाहिजे तो या ठिकाणी आपण दाखिविलेला नाही. उलटपक्षी आपण कोणताही अनुशेष नाही असे दाखविले आहे. तेव्हा त्याबाबत आपण योग्य तो खुलासा करावा असे सुचित केले असता त्यावर प्रादेशिक व्यवस्थापक, अमरावती यांनी या ठिकाणी दिलेल्या माहितीवरून असे दिसत आहे की, अतांत्रिकची २७ पदे भरलेली आहेत आणि त्यांनतर अतांत्रिक वर्ग ४ ची १८ पदे भरलेली आहेत. अतांत्रिकची एकंदर ५ पदे आहेत. अशी एकूण बेरीज ५० होते. हे सगळे पाहिले तर यामध्ये १८ पदांचे आरक्षण आहे आणि ती सगळी पदे भरलेली आहेत. त्यामुळे यामध्ये अनुशेष शून्य आहे. किंबहुना यामध्ये दोन पदे जास्त आपण अनुशेषातून भरली आहेत. आता विभाग नियंत्रकांनी सांगितल्याप्राणे दोन पदे खात्यामार्फत भरण्याची कार्यवाही सुरू असून अन्य 'स्वच्छक' ची दोन पदे भरण्यावर बंदी असल्याने अनुशेष भरता येत नाही असे समितीला सांगितले. समितीने या कार्यालयाने दिलेल्या माहितीमध्ये विसंगती असल्याचे मत व्यक्त केले.

महामंडळाच्या अकोला प्रादेशिक विभागात काम करणाऱ्या अनुसूचित जमातीच्या कर्मचारी/अधिकारी यांच्या जातीच्या दाखल्याची जात पडताळणी केली आहे काय, असल्यास गेल्या तीन वर्षांत किती अधिकारी /कर्मचारी यांच्या दाखल्याची तपासणी करण्यात आली आहे, त्यापैकी किती वैध व अवैध प्रमाणपत्रे आढळून आली, अवैध प्रमाणपत्रधारकावर काय कारवाई केली अशी समितीने विचारणा केली असता विभागीय नियंत्रक यांनी अनुसूचित जमातीचे १६३ कर्मचारी असून ५४ कर्मचाऱ्यांनी कागदपत्रे सादर केली आहेत. १०९ कर्मचाऱ्यांनी कागदपत्रे सादर केलेली नाहीत. २४ कर्मचाऱ्यांची प्रमाणपत्रे वैध ठरलेली आहेत, १४ कर्मचाऱ्यांची प्रमाणपत्रे अवैध ठरली आहेत. १०९ पैकी ६७ कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत. तसेच १४ अवैध ठरलेल्या प्रमाणपत्रधारकांपैकी ६ कर्मचाऱ्यांना सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. ८ कर्मचारी कोर्टात गेल्यामुळे त्याना संरक्षण देण्यात आले आहे.

अशी समितीला माहिती दिली. समितीने कागदपत्रे सादर न केलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या १०९ आहे. त्यांना कागदपत्रे सादर करण्यासाठी आणखी किती कालावधी लागेल खरे तर सहा महिन्याच्या आत जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. ज्यांच्याकडे जात पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे अशा अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना संधी मिळू शकेल तसेच १९९५ नंतर नेमण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना अशा प्रकारे संरक्षण देता येणार नाही. या कर्मचाऱ्यांना अनुसूचित जमातीमध्ये न दाखविता खुल्या संवर्गात दाखवावे लागेल त्यामुळे अनुसूचित जमातीची तेवढी पदे रिक्त होतील.

शासनाचे याबाबतीतील नियम आणि सुप्रीम कोर्टाने दिलेला निर्णय यानुसार आपल्याला याबाबत कारवाई करावयाची आहे अशी विचारणा केली असता अपर आयुक्त, अमरावती यांनी १९९५ पूर्वीचे जे लोक आहेत त्यांना मात्र शासनाने संरक्षण दिलेले आहे. १९९५ नंतर सेवेमध्ये आलेल्यांना मात्र सेवेतून कमी करता येऊ शकते असे सांगितले असता समितीने त्यांना सेवेतून कमी केल्याने आदिवासींच्या ज्या जागा रिक्त होणार आहेत त्या सर्व आदिवासी समाजातून भरण्याच्या दृष्टीने तातडीने करवाई करावी असे समितीने निदेश दिले.

## यवतमाळ प्रादेशिक कार्यालय

दिनांक २ मार्च, २००९ रोजी यवतमाळ येथे झालेल्या बैठकीच्या वेळी पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.

| पदांचे नाव | आरक्षित पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| | अनु. जमाती | अनु. जमाती | अनु. जमाती |
| वर्ग ३ | ४१५ | ३४८ | ६७ |
| वर्ग ४ | ३८९ | ३९ | १२ |

| पदांचे | सरळसेवा भरती | | | | | | खात्यामार्फत पदोन्नतीने | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नाव | मंजूर पदे | एकूण कार्यरत कर्मचारी | अनु. जमातीसाठी आरक्षित पदे | अनु. जमातीचे प्रत्यक्ष कार्यरत कर्मचारी | एकूण रिक्त पदे | अनु. जमातीचे रिक्त पद | मंजूर पदे | एकूण कार्यरत कर्मचारी | अनु. जमातीसाठी आरक्षित पदे | अनु. जमातीचे प्रत्यक्ष कार्यरत कर्मचारी | एकूण रिक्त पदे | अनु. जमातीचे रिक्त पद |
| वर्ग ३ | २४८७ | १४७६ | ३४९ | ३४८ | ३१६ | ६६ | ४५२ | २९१ | ३० | १६ | ११७ | १६ |
| वर्ग ४ | ३८९ | २९९ | ५१ | ४१ | ९० | १० | ५ | ३ | .. | -- | २ | .. |

समितीने दिनांक २ मार्च, २००९ रोजी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, प्रादेशिक कार्यालय, यवतमाळ येथे प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने बैठक घेऊन संबंधित अधिकाऱ्यासमवेत चर्चा केली.

समितीने यवतमाळ विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्यामध्ये प्रत्येक श्रेणीत अनुसूचित जमातीच्या उमेदवारांचा अनुशेष सध्या किती आहे सदर अनुशेष भरण्यासाठी गेल्या दोन वर्षात काय प्रयत्न करण्यात आले आहेत तसेच एकूण मंजूर पदे किती, सरळसेवा व पदोन्नतीने भरलेली पदे किती आहेत, अशी विचारणा केली, असता विभागीय व्यवस्थापक यांनी सन २००४ मध्ये प्रमुख कारागीर या रिक्त पदासाठी जाहिरात देण्यात आली होती. त्यासाठी डिसेंबर, २००७ पर्यंतची माहिती मागविली होती. कनिष्ठ सहाय्यक वरिष्ठ लिपीक ही दोन पदे मंजूर होती व त्यातील एक पद अनुसूचित जमातीतून भरण्यात आले व एक पद रिक्त आहे. असे समितीला सांगितले

समितीने यवतमाळ जिल्ह्यातील राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या प्रादेशिक कार्यालयात वर्गनिहाय बिंदुनामावली तयार केल्याचे दिसत नाही. अनुसूचित जमातीचा अनुशेषाप्रमाणे एकूण ३४८ पदे भरलेली व वाहनचालकाची ३४ पदे रिक्त असल्याचे दिसून येते. वास्तविक वाहन चालकाची एकूण १५४ पदे भरावयाची होती परंतु आपण १८८ पदे फक्त चालकाची भरलेली आहेत, याचे कारण काय, यावरुन आकडेवारीत ताळमेळ दिसत नाही. अशी समितीने पुन्हा विचारणा केली त्यावर विभागीय महाव्यवस्थापक यांनी खुल्या प्रवर्गामध्ये ज्यांनी अर्ज केले त्यामध्ये आदिवासीचे असले तरी त्यांना खुल्या प्रवर्गातून घेण्यात येते. त्यामुळे ही परिस्थिती दिसून येत आहे असे समितीला सांगितले.

समितीने चालकांची अनुसूचित जमाती या प्रवर्गातील १८८ पदे भरलेली आहेत. त्या सर्व कर्मचाऱ्यांची जात पडताळणी करुन घेण्यात आली आहे काय, या कर्मचाऱ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र कधी प्राप्त झाली आहेत अशी विचारणा केली असता, विभागीय अधिकारी यांनी २००७ पर्यंतच्या कर्मचाऱ्यांची जात वैधता प्रमाणपत्रे प्राप्त झालेली आहे, यापैकी ११२ कर्मचाऱ्यांची जात पडताळणी झालेली आहे असे सांगितले, उर्वरित कर्मचाऱ्यांची जात पडताळणी अद्यापपर्यंत का झाली नाही. उमेदवारांना नियुक्ती पत्रे दिल्यानंतर त्यांची जात पडताळणी किती दिवसात केली पाहिजे. या संदर्भात सुप्रीम कोर्टाचे आदेश काय आहेत अशी विचारणा केली असता, विभागीय अधिकारी यांनी ११२ कर्मचाऱ्यांची जात पडताळणी झालेली आहे. उर्वरित कर्मचाऱ्यांचे जात पडताळणीचे काम प्रगतीपथावर आहे. अशा कर्मचाऱ्यांची जात पडताळणी सहा महिन्यांच्या आत केली गेली पाहिजे अशा प्रकारचे कोर्टाचे आदेश आहेत. असे समितीला सांगितले. समितीने अनुसूचित जमाती या प्रवर्गातील ज्या कर्मचाऱ्यांना नेमणूका देऊन सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधी झाला असेल व त्यांनी अद्यापपर्यंत जात वैधता प्रमाणपत्र कार्यालयास सादर केलेले नसेल अशा कर्मचाऱ्यांना ताबडतोब बडतर्फ करावे. समितीने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी केली गेली नाही तर आपणावर देखील कारवाई होऊ शकते. असे निदेश दिले.

समितीने बिंदुनामावलीची तपासणी केल्याशिवाय जाहिरात काढता येत नाही. या कार्यालयाने बिंदुनामावलीची तपासणी न करता जाहिरात कशी काय काढली. तसेच सहायक आयुक्त, मागासवर्गीय कक्षाने बिंदुनामावली तपासणी संबंधीची सविस्तर टिप्पणी वेळोवेळी मागून सुध्दा आपल्या कार्यालयाने ती माहिती सादर केली नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे. मागासवर्गीय कक्षेकडून बिंदुनामावलीची तपासणी करुन घेतली नाही ही गंभीर बाब आहे. या कार्यालयात एकूण किती पदे मंजूर आहेत, टक्केवारीप्रमाणे अनुसूचित जमाती या प्रवर्गासाठी किती पदे येतात, त्यातील प्रत्यक्षात किती पदे भरण्यात आलेली आहे, किती पदे रिक्त आहेत, सदरहू प्रवर्गातील पदे रिक्त राहण्याची कारणे काय आहेत, तसेच अनुसूचित जमातीतील किती कर्मचाऱ्यांना कोणकोणत्या संवर्गात पदोन्नती देण्यात आली आहे. या संबंधीची सर्व माहिती समितीला साक्षीच्या बैठकीत सादर करावी असे समितीने निदेश दिले.

## मुंबई विभाग

दिनांक २७ फेब्रुवारी, २००९ रोजी मुंबई प्रादेशिक कार्यालय येथे झालेल्या बैठकीच्यावेळी पुढील प्रमाणे माहिती प्राप्त झाली.

कोकण विभागात अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी वर्ग ३ व ४ घटक संवर्ग मध्ये तांत्रिक/अतांत्रिक तसेच चालक/वाहक इत्यादी एकूण भरलेली मंजूर पदे व रिक्त पदे बाबत माहे जानेवारी, २००९ अखेर प्रत्यक्षात वर्गनिहाय स्थिती खालीलप्रमाणे आहे.

### प्रादेशिक कार्यालय, मुंबई

| अ.क्र. | पदाचे नाव | मंजूर पदे | | | अनुसूचित जमातीचे आरक्षण | | | राखीव पदापैकी भरलेली | | | रिक्त पदे | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सरळ सेवा | खात्यामार्फत | एकूण | सरळ सेवा | खात्यामार्फत | एकूण | सरळ सेवा | खात्यामार्फत | एकूण | सरळ सेवा | खात्यामार्फत | एकूण |
| वर्ग ३ | तांत्रिक पदे | | | | | | | | | | | | |
| | एकूण | ४४ | १३५ | १७९ | ४ | ५ | १३ | ० | ६ | ६ | -४ | -३ | -७ |
| वर्ग ३ | अतांत्रिक पदे | | | | | | | | | | | | |
| | एकूण | २३२ | ३०१ | ४३३ | १८ | २१ | ३९ | १२ | १७ | ३९ | -६ | -४ | -१० |
| वर्ग ४ | तांत्रिक पदे | २४३ | ० | २४३ | १७ | ० | १७ | १९ | ० | १९ | २ | ० | २ |
| वर्ग ४ | अतांत्रिक पदे | | | | | | | | | | | | |
| | एकूण | १०७ | ० | १०७ | ८ | ० | ८ | १४ | ० | १४ | ६ | ० | ६ |
| १ | चालक (कनिष्ठ) | १०४३ | ० | १०४३ | ७३ | ० | ७३ | ५५ | ० | ५५ | -१८ | ० | -१८ |
| २ | वाहक (कनिष्ठ) | १०९९ | ० | १०९९ | ७१ | ० | ७१ | ६३ | ० | ६३ | -८ | ० | -८ |
| वर्ग ३ | व ४ ची बेरीज | २६८८ | ४३६ | ३१२४ | १९१ | ३० | २२१ | १६३ | २३ | १८६ | -२८ | -७ | -३५ |

## प्रादेशिक कार्यालय, रायगड

| अ.क्र. | वर्ग | मंजूर पदे सरळ सेवा | मंजूर पदे पदोन्नती | मंजूर पदे एकूण | अनुसूचित जमातीचे आरक्षण सरळ सेवा | अनुसूचित जमातीचे आरक्षण पदोन्नती | अनुसूचित जमातीचे आरक्षण एकूण | अनु. जमातीचे प्रत्यक्षात भरलेली सरळ सेवा | अनु. जमातीचे प्रत्यक्षात भरलेली पदोन्नती | अनु. जमातीचे प्रत्यक्षात भरलेली एकूण | रिक्त पदे सरळ सेवा | रिक्त पदे पदोन्नती | रिक्त पदे एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | तांत्रिक पदे वर्ग-३ | | | | | | | | | | | | |
| | घटकांसाठी | ८५ | ४७८ | ५६३ | ७ | ३३ | ४० | १ | १८ | १९ | ६ | १५ | २१ |
| | वर्ग-४ | ३४७ | - | ३४७ | ३१ | .. | ३१ | २६ | - | २६ | ५ | - | ५ |
| | एकूण | ४३२ | ४७८ | ९१० | ३८ | ३३ | ७१ | २७ | १८ | ४५ | ११ | १५ | २६ |
| २) | अतांत्रिक पदे वर्ग-३ | | | | | | | | | | | | |
| | घटकांसाठी | २६६ | १३९ | ४०५ | २३ | ९ | ३२ | २४ | ६ | ३० | +१ | ३ | २ |
| | वर्ग-४ | १५१ | ५ | १५६ | १३ | .. | १३ | ९ | .. | ९ | ४ | .. | ४ |
| | एकूण | ४१९ | १४३ | ५६२ | ३६ | ९ | ४५ | ३३ | ६ | ३९ | ३ | ३ | ६ |
| ३) | वाहक | १०८९ | .. | १०८९ | ९८ | .. | ९८ | ६८ | .. | ६८ | ३० | .. | ३० |
| ४) | चालक | १११२ | .. | १११२ | १०० | .. | १०० | ५३ | .. | ५३ | ४७ | .. | ४७ |
| | एकूण ३+४ | २२०१ | .. | २२०१ | १९८ | .. | १९८ | १२१ | .. | ७७ | .. | ७७ | .. |
| | एकूण १+२+३+४ | ३०५० | ६२२ | ३६७२ | २७२ | ४२ | ३१४ | १८१ | २४ | २०५ | ९१ | १८ | १०९ |

## प्रादेशिक कार्यालय, ठाणे

| अ.क्र. | वर्ग | मंजूर पदे सरळ सेवा | मंजूर पदे खात्या-मार्फत | मंजूर पदे एकूण | अनुसूचित जमातीसाठी आरक्षण सरळ सेवा | अनुसूचित जमातीसाठी आरक्षण खात्या-मार्फत | अनुसूचित जमातीसाठी आरक्षण एकूण | डिसेंबर २००८ अखेर भरलेली पदे सरळ सेवा | डिसेंबर २००८ अखेर भरलेली पदे खात्या-मार्फत | डिसेंबर २००८ अखेर भरलेली पदे एकूण | अनुशेष सरळ सेवा | अनुशेष खात्या-मार्फत | अनुशेष एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | तांत्रिक पदे (घटक संवर्ग) | | | | | | | | | | | | |
| | वर्ग - ३ | ८८ | ५२० | ६०८ | १८ | ३६ | ५४ | ५ | ४० | ४५ | १३ | +४ | ९ |
| | वर्ग-४ | ३९० | ० | ३९० | ८६ | ० | ८६ | ६३ | ० | ६३ | २३ | ० | २३ |
| | एकूण | ४७८ | ५२० | ९९८ | १०४ | ३६ | १४० | ६८ | ४० | १०८ | ३६ | +४ | ३२ |
| २) | अतांत्रिक पदे (घटक संवर्ग) | | | | | | | | | | | | |
| | वर्ग-३ | ३२८ | १७९ | ५०७ | ६९ | १३ | ८२ | ३२ | १२ | ४४ | ३७ | १ | ३८ |
| | वर्ग-४ | १७० | ५ | १७५ | ३२ | ० | ३२ | १४ | १ | १५ | १८ | +१ | १७ |
| | एकूण | ४९८ | १८४ | ६८२ | १०१ | १३ | ११४ | ४६ | १३ | ५९ | ५५ | १ | ५५ |
| ३) | चालक | १४०५ | ० | १४०५ | ३०९ | ० | ३०९ | १२६ | ० | १२६ | १८३ | ० | १८३ |
| ४) | वाहक | १३७५ | ० | १३७५ | ३०३ | ० | ३०३ | ९५ | ० | ९५ | २०८ | ० | २०८ |
| | एकूण ३+४ | २७८० | ० | २७८० | ६१२ | ० | ६१२ | २२१ | ० | २२१ | ३९१ | ० | ३९१ |
| | एकूण १+२+३+४ | ३७५६ | ७०४ | ४४६० | ८१७ | ४९ | ८६६ | ३३५ | ५३ | ३८८ | ४८२ | +४ | ४७८ |

ठाणे विभागातील अनुसुचित जमातीच्या कर्मचाऱ्यांची जात प्रमाणपत्राची तपासणी करण्यात आली आहे.

| तांत्रिक पदे | तपासणीसाठी पाठवीले | वैध | अवैध | अनिर्णित |
|---|---|---|---|---|
| | ३१ | ११ | ७ | १२ |

एकूण ७ अवैधपैकी ५ कर्मचाऱ्यांनी विशेष मागास प्रवर्गाचे दाखले सादर केले व वैध ठरले आहेत. उर्वरीत २ उमेदवारांनी वि.मा.प्र. चे दाखले सादर केले आहेत व ते तपासणी समितीकडे प्रलंबित आहेत.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अतांत्रिक पद | ५ | १ | ० | ४ |
| वाहक | २ | ० | ० | २ |
| चालक | २८ | २७ | १ | ० |
| एकूण | ३५ | २८ | १ | ६ |

याशिवाय जात पडताळणीसाठी आरक्षण कागदपत्रे सादर न केलेल्या तांत्रिक/अतांत्रिक पदे, चालक, वाहक या उमेदवारांची एकूण २९ प्रकरणे प्रलंबित आहेत.

**प्रादेशिक कार्यालय - सिंधुदुर्ग** विभागातील वर्गनिहाय अनु.जमातीच्या आरक्षणाची माहिती

| अ.क्र. | वर्ग | एकूण मंजूर पदे | | | अनुसूचित जमातीचे आरक्षण | | | अनु. जमातीचे प्रत्यक्षात भरलेली | | | रिक्त पदे | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सरळ सेवा | पदोन्नती | एकूण | सरळ सेवा | पदोन्नती | एकूण | सरळ सेवा | पदोन्नती | एकूण | सरळ सेवा | पदोन्नती | एकूण |
| १) | तांत्रिक पदे वर्ग-३ | | | | | | | | | | | | |
| | घटकांसाठी | ५२ | २९२ | ३४४ | ४ | २२ | २६ | - | ५ | ५ | ४ | १७ | २१ |
| | वर्ग-४ | २०७ | -- | २०७ | १५ | - | १५ | ५ | - | ५ | १० | - | १० |
| | **एकूण** | २५९ | २९२ | ५५१ | १९ | २२ | ४१ | ५ | ५ | १० | १४ | १७ | ३१ |
| २) | अतांत्रिक पदे वर्ग-३ | | | | | | | | | | | | |
| | घटकांसाठी | २०६ | १११ | ३१७ | १६ | ८ | २४ | १ | ६ | ७ | १५ | २ | १७ |
| | वर्ग-४ | ११६ | ५ | १२१ | ७ | -- | ७ | २ | -- | २ | ५ | - | ५ |
| | **एकूण** | ३२२ | ११६ | ४३८ | २३ | ८ | ३१ | ३ | ६ | ९ | २० | २ | २२ |
| ३) | चालक | ८९२ | - | ८९२ | ६२ | - | ६२ | ९ | - | ९ | ५३ | - | ५३ |
| ४) | वाहक | ८७४ | - | ८७४ | ६१ | - | ६१ | २२ | -- | २२ | ३९ | -- | ३९ |
| | **एकूण ३+४** | १७६६ | - | १७६६ | १२३ | -- | १२३ | ३१ | - | ३१ | ९२ | - | ९२ |
| | **एकूण १+२+३+४** | २३४७ | ४०८ | २७५५ | १६५ | ३० | १९५ | ३९ | ११ | ५० | १२६ | १९ | १४५ |

मंडळाच्या कोकण विभागात काम करणाऱ्या अनुसूचित जमातीच्या कर्मचारी/अधिकारी यांच्या जातीच्या दाखल्याची जात पडताळणी केली आहे काय? असल्यास गेल्या तीन वर्षात किती अधिकारी/कर्मचारी यांच्या दाखल्याची तपासणी करण्यात आली आहे? त्यापैकी किती वैद्य व किती अवैद्य प्रमाणपत्रे आढळून आली आहेत, अवैद्य प्रमाणपत्र धारकावर मंडळाकडून काय कार्यवाही केली त्याची सद्य:स्थिती काय आहे. याबाबत पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला.

**खुलासा :** मागील ३ वर्षात कोकण विभागात अनुसूचित जमातीच्या कर्मचाऱ्यांच्या जातीच्या दाखल्यांची पडताळणी करण्यासाठी एकूण ५० प्रकरणे पाठविण्यात आली होती. त्यापैकी २९ प्रकरणे प्रमाणपत्र वैद्य आढळली व १ प्रमाणपत्र अवैद्य ठरविण्यात आले असून सदर कर्मचारी जून १९९५ पूर्वीचा असल्याने शासन निर्णयानुसार सेवेचे संरक्षण देऊन त्या उमेदवाराला अनुसूचित जमातीच्या आरक्षनातून वगळून विशेष मागास प्रवर्गाची जात पडताळणी करुन त्या प्रवर्गात वर्ग केले आहे. उर्वरीत २० पैकी ९ कर्मचाऱ्यांनी जात पडताळणीसाठी कागदपत्रे सादर न केल्याने त्यांचेवर खात्यांतर्गत कारवाई सुरु आहे व ११ प्रकरणे (औरंगाबाद १, ठाणे ६, पुणे २, नाशिक १, अमरावती १) प्रलंबित आहेत याबाबत वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येत आहे.

समितीने दिनांक २७ फेब्रुवारी, २००९ रोजी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई प्रादेशिक कार्यालय (कुर्ला, मुंबई) येथे प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने बैठक घेऊन संबंधित अधिकाऱ्यासमवेत चर्चा केली.

मुंबई विभाग

समितीने प्रादेशिक विभाग, मुंबई या विभागातील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ विभागामध्ये वर्ग १ ते ४ मधील तांत्रिक/अतांत्रिक, वाहक/चालक इ. ची एकूण किती पदे मंजूर आहे. त्यापैकी डिसेंबर, २००८ अखेर प्रत्यक्षात वर्गनिहाय किती पदे भरण्यात आली असे विचारले असता, विभाग नियंत्रक, मुंबई यांनी चालक वर्ग - ३ च्या तांत्रिक पदातील सरळ सेवेची ४५ व पदोन्नतीची १८० अशाप्रकारे एकूण २२५ पदे मंजूर आहेत. सरळ सेवेने भरावयाच्या पदांबाबत भरती प्रक्रियेची कार्यवाही सुरु आहे. त्यापैकी २५६ पदे भरलेली आहेत. डिसेंबर २००८ अखेर सरळसेवेची २१ व पदोन्नतीची ३८ पदे रिक्त आहे. असे समितीला सांगितले. समितीने अनुसूचित जमातीमध्ये सरळ सेवेची किती व कोणती पदे रिक्त आहेत. ती पदे केव्हापासून रिक्त आहेत. तसेच पदोन्नती का देण्यात आली नाही अशी विचारणा केली असता विभागीय कर्मचारी अधिकारी यांनी सरळ सेवेने भरावयाच्या ४ जागांचा तांत्रिक पदांमध्ये व ६ जागांचा अतांत्रिक पदांमध्ये अनुशेष आहे. तसेच तांत्रिक पदांमध्ये पदोन्नतीतील ३ जागांचा व अतांत्रिक पदांमध्ये ४ जागांचा अनुशेष आहे. प्रमुख कारागीर मध्ये सरळ सेवा व पदोन्नतीचे प्रत्येकी १ पद रिक्त आहे. कारागीर क मध्ये सरळ सेवेची ३ व पदोन्नतीची २ पदे रिक्त आहेत. दिनांक १७ ऑक्टोबर, २००८ रोजी जाहिरात दिली असून आत रिक्त पदांच्या भरतीची प्रक्रिया

सुरु आहे. तसेच समितीच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, रिक्त असलेली पदे आम्हाला स्वतःहून भरता येत नाहीत मध्यवर्ती कार्यालयाकडून सरळ सेवेची पदे भरण्याची परवानगी मिळाल्यानंतरच भरती करता येते. मध्यवर्ती कार्यालयाकडून परवानगी न मिळाल्यामुळेच रिक्त पदे भरु शकलो नाही. असे समितीला सांगितले. समितीने अनुसूचित जमातीची रिक्त असलेली पदे भरण्याबाबत उच्च व सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आहेत. शिवाय त्याबाबतचा शासन निर्णय सुध्दा आहे. असे असताना देखील आपण त्या निर्णयांचे पालन करीत नाही. आताच विभागीय कर्मचारी अधिकाऱ्यांनी सांगितले की, २००५ सालापासून मध्यवर्ती कार्यालयाकडून रिक्त पदे भरण्यासाठी परवानगी मिळाली नाही. मध्यवर्ती कार्यालयाकडून रिक्त पदे भरण्यासाठी परवानगी का मिळाली नाही, वास्तविक पाहता ही पदे गेल्या ४-५ वर्षापासून रिक्त आहेत. याचाच अर्थ अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना जाणीवपूर्वक नोकरीपासून वंचित ठेवण्यात आले आहे. अनुसूचित जमातीचे उमेदवार मुंबई विभागात उपलब्ध होत नसल्यामुळे नजिकच्या ठाणे, रायगड जिल्ह्यातील उमेदवारांना सामावून घेता आले असते. मुंबई विभागात अनुसूचित जमातींचा वर्ग-३ मध्ये अनुशेष शिल्लक आहे, ती भरण्यासाठी आपण कोणते प्रयत्न केले आहेत, अशी समितीने विचारणा केली त्यावर विभागीय कर्मचारी अधिकारी यांनी मुंबईतील वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द केली असती तरी देखील अन्य जिल्ह्यातील विभागीय कार्यालयामध्ये जाहिरात पाठवून देतो असे समितीला सांगितले. समितीने अनुसूचित जमातीची पदे भरण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत. चालक, वाहक पदे भरण्यासाठी आपणाला कधी परवानगी दिलेली आहे. यात अनुसूचित जमातीची किती पदे आहेत अशी विचारणा केली असता विभागीय कर्मचारी अधिकारी यांनी सन १९९८ मध्ये महामंडळाची अर्थिक परिस्थिती चांगली नसल्यामुळे नवीन भरतीवर, नवीन वाहन खरेदीवर बंदी होती. त्यामुळे पदे भरण्यासंबंधीची कार्यवाही करण्यात येत नव्हती. तद्नंतर महामंडळाने काही कालावधीनंतर चालक, वाहक भरण्यासंबंधीचा निर्णय घेतला. तद्नंतर अनुकंपात्वाची पदे भरण्यास महामंडळाने परवानगी दिली. सन २००२ मध्ये प्रमुख कारागीर, चालक, वाहक, सहायक ही पदे भरायला महामंडळाने परवानगी दिल्यानंतर प्रक्रिया सुरु करण्यात आली. मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या सहाही विभागांनी वर्ग-३ आणि वर्ग-४ ची पदे भरण्यासंबंधीचा भरती प्रक्रियेबाबतचा प्रस्ताव मध्यवर्ती कार्यालयाकडे पाठवून देखील मध्यवर्ती कार्यालयाने भरती प्रक्रियेस परवानगी दिली नाही अशी समितीने पुन्हा विचारणा केली त्यावर प्रादेशिक व्यवस्थापक यांनी सर्व विभागांच्यावतीने सांगू इच्छितो की, प्रत्येक विभागाने भरती प्रक्रियेबाबत स्वतंत्ररित्या प्रस्ताव पाठवूनसुध्दा मध्यवर्ती कार्यालयाकडून भरती प्रस्तावासंबंधी काहीही कळविण्यात आलेले नाही. असे समितीला सांगितले, समितीने सन २००५ ते २००८ या कालावधीत वर्ग-३ व वर्ग-४ वर्गातील अनुसूचित जमातीची पदे का भरली नाहीत. मध्यवर्ती कार्यालयाकडून परवानगी आलेली नाही म्हणजेच अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना डावलण्यासाठी जाणूनबुजून प्रयत्न केला आहे असे समितीचे मत झालेले आहे.

मुंबई विभागामध्ये अनुसूचित जमातीची किती पदे भरली आहेत व त्यापैकी किती उमेदवारांच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी झाली आहे व किती उमेदवारांची जातपडताळणी होणे अद्यापी शिल्लक आहे अशी विचारणा केली त्यावर विभागीय कर्मचारी अधिकारी यांनी मुंबई विभागामध्ये एकूण ३१२४ पदे असून त्यापैकी अनुसूचित जमातीसाठी २२१ पदे आहेत. यापैकी १८६ पदे भरली असून ३५ पदे रिक्त आहेत. अनुसूचित जमातीचे एकूण १८६ कर्मचारींपैकी १४१ कर्मचाऱ्यांनी जात पडताळणीसंबंधीची कागदपत्र सादर केलेली आहेत. कागदपत्र सादर न केलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या ४५ आहे. समितीकडे कागदपत्रे तपासणीसाठी पाठविल्यानंतर १२२ कर्मचाऱ्यांची प्रमाणपत्र वैध ठरविण्यात आली असून ४ कर्मचाऱ्यांची कागदपत्रे अवैध ठरविण्यात आली आहेत. अद्याप १५ कर्मचाऱ्यांच्या कागदपत्रासंबंधी निर्णय प्राप्त झालेला नाही. जातीचा अवैध दाखला सादर करण्यात आल्यानंतर एका कर्मचाऱ्याला संरक्षण देण्यात आले आहे तर दोन कर्मचाऱ्यांना सेवेतून कमी करण्यात आले आहे तसेच न्यायालयात १ प्रकरण प्रलंबित आहे. एक उमेदवार सन १९९५ पूर्वीचा होता त्याला एसबीसीमध्ये ग्राह्य धरण्यात आले. अन्य उमेदवारांवर विभागाने कारवाई केली आहे. तर काहींना पदावनत केलेले आहे असे समितीला सांगितले. समितीने सरळसेवेद्वारा जे कर्मचारी नियुक्त झाले आहेत त्याच्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे. ज्यांनी जातीचा खोटा दाखला दिला आहे, त्यांना चार्जशीट देण्याची तरतूद आहे काय, अशा कर्मचाऱ्यांना पदावनत का करत नाही असे विचारण केली असता विभागीय कर्मचारी अधिकारी यांनी काही व्यक्ती १९९५ पूर्वीच्या असल्यामुळे त्यांना पदावनत केले आहे, तर १ कर्मचारी कोर्टात गेला असून, इतरांना सेवेतून बडतर्फ केले आहे. १५ कर्मचाऱ्यांची प्रकरणे जात पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत. सर्व प्रकरणे २००४ मध्ये जात पडताळणी समितीकडे पाठविलेली आहेत असे सांगितले समितीने जात पडताळणी समितीकडून जातीचे वैधता प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्याची जाबाबदारी कोणाची आहे. १९९५ नंतरचा उमदेवार असल्यास आणि ती व्यक्ती जर जात पडताळणीसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे देत नसेल तर त्याला ६ महिन्यांची संधी द्यावी. सहा महिन्यांच्या कालावधीत जर त्याने आवश्यक ती कागदपत्रे दिली नाही तर त्याला बडतर्फ करावयास पाहिजे. शासनाचे आणि सर्वोच्च न्यायालयाचे सुध्दा तसे आदेश आहेत. १८६ प्रकरणांपैकी १२२ प्रकरणांमध्ये जात पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे. १५ प्रकरणांच्या बाबतचा निर्णय अद्यापही जात पडताळणी समितीकडे प्रलंबित आहे. ज्यांनी जात पडताळणी प्रमाणपत्रासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पूर्तता केली नाही त्यांना कागदपत्रे सादर करण्यासाठी ८ दिवसांची मुदत द्यावी. त्यांनी दिलेल्या मुदतीत आवश्यक ती कागदपत्रे सादर केली नाही तर १५ दिवसांमध्ये त्यांना सेवेतून बडतर्फ करावे असे समितीने निदेश दिले.

**पेण विभाग**

समितीने या विभागांतर्गत अनुसूचित जमातीची किती पदे रिक्त आहेत वर्ग-३ व वर्ग-४ श्रेणीमध्ये सरळसेवेची एकूण मंजूर पदे किती आहेत. त्यापैकी किती पदे रिक्त आहेत अशी विचारणा केली

असता विभाग नियंत्रक, रायगड यांनी वर्ग-३ व ४ ची तांत्रिक/अतांत्रिक, चालक व वाहकांची सरळ सेवा व पदोन्नती मध्ये एकूण १०९ पदे रिक्त आहेत. सरळ सेवेची एकूण मंजूर पदे ३०५० असून, रायगड जिल्ह्यात अनुसूचित जमातीसाठी आरक्षणाचे प्रमाण ९ टक्के आहे. त्यानुसार सरळ सेवेमध्ये अनुसूचित जमातीसाठी २७२ पदांचे आरक्षण आहे. तसेच पदोन्नतीमध्ये ४२ पदांचे आरक्षण आहे. अशाप्रकारे अनुसूचित जमातीसाठी ३१४ पदांचे आरक्षण आहे असे समितीला सांगितले, समितीने अनुसूचित जमातीची सरळ सेवेमध्ये ९१ व पदोन्नतीमध्ये १८ पदांचा अनुशेष आहे. तसेच वर्ग-३ च्या तांत्रिक पदांमधील सरळ सेवेमध्ये ६ व पदोन्नतीमध्ये १५ पदांचा अशा प्रकारे २१ पदांचा अनुशेष आहे व वर्ग-४ च्या तांत्रिक पदांमधील सरळ सेवेमध्ये ५ पदांचा अनुशेष आहे. ही पदे केव्हापासून रिक्त आहेत, रिक्त पदे केव्हा भरण्यात येतील अशी विचारणा केली असता विभागीय नियंत्रक, रायगड यांनी सन २००४ पासून पदे रिक्त आहेत. सदर पदे भरण्याची जाहिरात कृषिवल या वृत्तपत्रामध्ये दिलेले आहे. मध्यवर्ती कार्यालयाने रिक्त पदे भरण्यास मान्यता दिल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल असे समितीला सांगितले. समितीने मधल्या काळात भरती करताना शासन निर्णयाचा आणि मा. न्यायालयाच्या निर्णयाचा अवमान केलेला आहे. शासन निर्णयामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, प्रथम अनुशेष भरा. अनुसूचित जमातीच्या संवर्गाचा अनुशेष तसाच ठेवून अन्य पदे भरण्यासाठी आपण प्रयत्न केले आहेत, असे समितीचे मत आहे.

रायगड विभागामधील पेणमध्ये अनुसूचित जमातीसाठी एकूण आरक्षण ३१४ आहे. त्यापैकी २०५ पदे भरलेली आहेत. डिसेंबर, २००८ मध्ये अनुसूचित जमातीची वर्ग-३ मध्ये तांत्रिक पदासाठी भरलेल्या पदांची संख्या ९ आहे, तर वर्ग-४ मध्ये तांत्रिक पदे भरलेल्यांची संख्या २६ आहे. या कर्मचाऱ्यांची भरती करताना जातपडताळणी झाली होती काय, किती कर्मचाऱ्यांची जातपडताळणी झाली आहे व किती कर्मचाऱ्यांची जात पडताळणी होणे बाकी आहे तसेच सन १९९५ पूर्वी रुजू झालेले किती कर्मचारी आहेत. यात सरळसेवेने १८१ पदे भरल्याचे नमूद केले आहे, तर वर्ग-३ची १८ पदे पदोन्नतीने भरली आहेत. वर्ग-४ची सरळसेवेने भरलेली पदे २६ आहेत, म्हणजे आपण २२५ पदे भरली आहेत. या २२५ पदांपैकी किती कर्मचाऱ्यांची प्रमाणपत्र वैध आहेत व किती कर्मचाऱ्यांची वैधता प्रमाणपत्र पडताळणीसाठी शिल्लक आहे अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय नियंत्रक यांनी अनुसूचित जमातीच्या १५९ कर्मचाऱ्यांपैकी ११७ कर्मचाऱ्यांनी त्यांच्या जातीच्या दाखल्याची प्रमाणपत्र व इतर कागदपत्र कार्यालयास सादर केली आहेत. त्यांची कागदपत्रे जात पडताळणी समितीकडे तपासणीकरिता पाठविण्यात आली होती. त्यापैकी ४६ कर्मचाऱ्यांच्या जाती पडताळणीचा निर्णय प्राप्त झालेला असून या ४६ प्रकरणांपैकी ४१ कर्मचाऱ्यांची प्रमाणपत्र वैध ठरविण्यात आली आहे, तर ५ कर्मचऱ्यांची प्रमाणपत्र अवैध ठरविण्यात आली आहेत. या पाच कर्मचाऱ्यांची नियुक्ती १९९५ पूर्वीची असल्याने त्यांना शासन निर्णय, ३० जून २००४ नुसार संरक्षण देण्यात आले आहे. उर्वरित कर्मचारी महामंडळाच्या सेवेत कार्यरत आहेत. **सध्या जात पडताळणी समितीकडे ७१ प्रकरणे प्रलंबित आहेत. त्याबाबत पत्रव्यवहार केलेला आहे. असे समितीला सांगितले.**

**ठाणे विभाग :**

समितीने ठाणे विभागात वर्ग-३ व ४ च्या तांत्रिक/अतांत्रिक, चालक, वाहक पदांमध्ये सरळ सेवेच्या ४८२ पदांचा अनुशेष आहे. तसेच ४ ठिकाणी अतिरिक्त पदोन्नती देण्यात आलेली आहे. अनुशेष दूर करण्यासाठी आपण काय प्रयत्न केले आहेत ? अशी विचारणा केली असता विभागीय नियंत्रक, ठाणे यांनी चालक, वाहक पदांची भरती करण्यासाठी सन २००८ मध्ये परवानगी मिळाली आहे. ज्या ठिकाणी पदोन्नती द्यावयाची होती त्या त्या ठिकाणी पदोन्नती दिलेली आहे असे सांगितले. समितीने सन २००५ मध्ये काही पदे भरण्यासाठी महामंडळाकडून परवानगी मिळाल्यानंतर अनुसूचित जमातीची रिक्त पदे भरण्यासाठी आपण काय प्रयत्न केले अशी पुन्हा विचारणा केली, त्यावर विभागीय नियंत्रक यांनी ४७८ पदांचा जो अनुशेष दाखविलेला आहे तो डिसेंबर, २००८ अखेरचा आहे. ऑक्टोबर, २००८ मध्ये कारागीर, हेल्पर, चालक, वाहक या पदांसाठी जाहिरात दिली होती. त्या जाहिरातीच्या अनुषंगाने भरतीची कार्यवाही सुरू आहे असे समितीला सांगितले.

समितीने सन २००८ मध्ये विशेष भरती मोहीम राबविलेली असताना देखील चालकांची १८३ व वाहकांची २०८ पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत अशी विचारणा केली, त्यावर विभागीय नियंत्रक यांनी मार्च, २००८ मध्ये चालक पदासाठी ४४ उमेदवार उपलब्ध झाले होते. त्यापैकी २० उमेदवारांचे प्रशिक्षण झाले असून ते रुजू सुध्दा झाले आहेत. परंतु वाहक पदासाठी उमेदवार मिळाले नाहीत असे समितीला सांगितले. समितीने वाहक पदासाठी ठाणे विभागातून जर उमेदवार मिळाले नाही तर आपण इतर विभागातून उमेदवार मिळण्यासाठी प्रयत्न केले काय. समिती आपल्याला अशा सूचना देते की, जाहिरात ही केवळ ठाणे जिल्ह्यात न देता नाशिक विभागामध्ये सुध्दा द्यावी. नाशिकमध्ये प्रशिक्षणाच्या सुविधा आहेत. त्यामुळे आपल्याला नाशिक येथून प्रशिक्षित उमेदवार उपलब्ध झाले असते अशी समितीने सूचना केली. समितीने डिसेंबर, २००८ अखेर सरळ सेवेची ३३५ व पदोन्नतीद्वारे ५३ पदे भरलेली आहेत. ज्यांना पदोन्नती दिली आहे त्या कर्मचाऱ्यांकडून जात पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे काय, त्यापैकी किती कर्मचाऱ्यांकडून प्रमाणपत्र प्राप्त होणे शिल्लक आहे अशी विचारणा केली असता विभागीय नियंत्रक यांनी १९९५ नंतर सामावून घेतलेल्या ६६ उमेदवारांची कागदपत्रे जात पडताळणी समितीकडे पाठविली आहेत. तसेच २९ उमेदवारानी जात पडताळणी प्रमाणपत्रासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे सादर केली नाहीत. कागदपत्रे सादर न करणाऱ्यांवर विभागामार्फत कारवाई करण्यात येत आहे. तसेच विभागामार्फत ज्या ३८८ कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आलेली आहे ते सर्व १९९५ पूर्वीचे आहेत असे समितीला सांगितले.

**रत्नागिरी विभाग :**

समितीने अनुसूचित जमातीची सरळ सेवेतून २७८ पदे भरावयाची असताना केवळ १६२ पदे भरलेली आहेत. तसेच पदोन्नतीद्वारे ४५ कर्मचाऱ्यांना पदोन्नती द्यावयास हवी होती. परंतु प्रत्यक्षात केवळ ९

कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिलेली आहे. सरळ सेवेतून भरलेल्या १६२ उमेदवारांपैकी १९९५ पूर्वीचे किती कर्मचारी आहेत ? अशी विचारणा केली असता विभागीय नियंत्रक रत्नागिरी यांनी १९९५ पूर्वीचे ११० उमेदवार आहेत. उर्वरित ५२ उमेदवार १९९५ नंतरचे आहेत. १९९५ पूर्वी भरती झालेल्या अनुसूचित जमातीच्या २८ कर्मचाऱ्यांना पदोन्नतीकरिता जात पडताळणी प्रमाणपत्रासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे सादर करण्याबाबत कळविले होते. परंतु त्यापैकी १६ कर्मचाऱ्यांनी अद्याप कागदपत्रे सादर न केल्याने त्यांच्याविरुध्द खातेनिहाय कारवाई सुरू आहे. उर्वरित १२ कर्मचाऱ्यांपैकी ७ कर्मचारी जात पडताळणीमध्ये अवैध ठरल्याने त्यांना सेवेतून कमी करण्यात आले हाते. सद्यःस्थितीत त्यांची प्रकरणे न्यायालयात आहेत. तसेच ५ कर्मचारी जात पडताळणीमध्ये वैध ठरले आहेत.

पदोन्नतीबाबतची ७ प्रकरणे कोर्टात होती. त्यापैकी ३ प्रकरणातील कर्मचारी बडतर्फ झाले असून ४ प्रकरणे प्रलंबित आहेत. ज्यांनी जात पडताळणीसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे सादर केली नाहीत त्यांच्यावर कारवाई करीत आहोत. इतर ५ प्रकरणांत वैधता प्रमाणपत्र मिळाले आहे. असे समितीला सांगितले.

समितीने सिंधुदुर्ग जिल्ह्यात अनुसूचित जमातीची किती पदे भरली आहेत यासंबंधीची विचारणा केली असता विभागीय नियंत्रक यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यात एकूण मंजूर पदे २७५५ असून अनुसूचित जमातीसाठी एकूण १९५ पदे आरक्षित आहेत. यापैकी ५० पदे भरली असून १४५ पदे रिक्त आहेत. अनुसूचित जमातीच्या कर्मचाऱ्यांच्या जातीच्या दाखल्याची पडताळणी करण्यासाठी ५० प्रकरणे पाठविण्यात आली होती. त्यापैकी २९ प्रकरणात प्रमाणपत्र वैध आढळली आहेत. १ प्रमाणपत्र अवैध ठरविण्यात आले असून सदर कर्मचारी जून, १९९५ पूर्वीचा असल्याने शासन निर्णयानुसार सेवेचे संरक्षण देऊन त्या उमेदवाराला अनुसूचित जमातीच्या आरक्षणातून वगळण्यात आले आहे. उर्वरित २० पैकी ९ कर्मचाऱ्यांनी जात पडताळणीसाठी कागदपत्र सादर न केल्याने त्यांच्यावर खात्यातंर्गत कारवाई सरू आहे व त्यांना चार्जशीट दिलेली आहे तर ११ प्रकरणे प्रलंबित आहेत असे समितीला सांगितले. समितीने सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये अनुसूचित जमातीचे उमेदवार मिळणार नाहीत. त्यामुळे अनुसूचित जमातीची पदे भरण्याकरिता आपण एटीसी, ठाणे व नाशिक यांच्याशी संपर्क साधून रिक्त पदे भरण्याकरिता पाठपुरावा करावा. तरच रिक्त पदे भरली जातील. विभागीय नियंत्रक यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये अनुसूचित जमातीचे उमेदवार नाहीत ही वस्तुस्थिती आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पदे भरण्याकरिता दिनांक १५ऑक्टोबर २००८ व १ नोव्हेंबर २००८ रोजीच्या दैनिक पुढारीमध्ये ५६ पदांसाठी जाहिरात दिली होती. यात अनुसूचित जमातीसाठी लिपिक टंकलेखकाची ५, चालकाची ४, वाहकाची ८, कारागीराचे १, सहायकाची ७ पदे आहेत. लिपिक टंकलेखकासाठी १६, चालकासाठी १, वाहकासाठी १५३, सहायकासाठी २८ अर्ज आले ओहत. त्याची प्रक्रिया सुरू आहे असे समितीला सांगितले.

**महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळात दिनांक ३१ मार्च २००९ रोजी प्रमाणे वर्ग-१ ते वर्ग-४ संवर्ग निहाय अधिकारी/कमचारी वर्गाची स्थिती पुढीलप्रमाणे आहे :—**

| अ.क्र. | वर्ग | मंजूर पदे | | | एकूण भरलेली पदे | | | रिक्त पदे | | | अनुसूचित जमातीचा अनुशेष | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सरळ सेवा | खात्या मार्फत | एकूण | सरळ सेवा | खात्या मार्फत | एकूण | सरळ सेवा | खात्या मार्फत | एकूण | सरळ सेवा | खात्या मार्फत | एकूण |
| १. | वर्ग-१ | ०३ | १६६ | १६९ | ०२ | ११५ | ११७ | ०१ | ५१ | ५२ | .. | ११ | ११ |
| २. | वर्ग-२ (वरिष्ठ) | ४२ | १५९ | २०१ | २६ | १२४ | १५० | १६ | ३५ | ५१ | १ | ९ | १० |
| | वर्ग-२ (कनिष्ठ) | २८४ | ३४६ | ६३० | १७४ | २५१ | ४२५ | ११० | ९५ | २०५ | ६ | १५ | २१ |
| | एकूण वर्ग-१, वर्ग-२(वरिष्ठ) व वर्ग-२ | ३२९ | ६७१ | १००० | २०२ | ४९० | ६९२ | १२७ | १८१ | ३०८ | ७ | ३५ | ४२ |
| ३. | वर्ग-३ (राज्यसंवर्ग) | १३१४ | १५९३ | २९०७ | ७१३ | ९१२ | १६२५ | ६०१ | ६८१ | १२८२ | ४४ | १९ | ६३ |
| ४. | वर्ग-३ (घटक-संवर्ग ) | ११७६६ | १८४४३ | ३०२०९ | ७८१४ | १३३७४ | २११८८ | ३९५२ | ५०६९ | ९०२१ | ५३५ | ३२६ | ८६१ |
| ५. | चालक | ३५४७० | - | ३५४७० | ३२२१५ | - | ३२२१५ | ३२५५ | - | ३२५५ | १०५३ | - | १०५३ |
| ६. | वाहक | ३५०५३ | - | ३५०५३ | ३१४७५ | .. | ३१४७५ | ३५७८ | - | ३५७८ | ७९८ | - | ७९८ |
| | एकूण ३, ४, ५ व ६ | ८३६०३ | २००३६ | १०३६३९ | ७२२१७ | १४२८६ | ८६५०३ | ११३८६ | ५७५० | १७१३६ | २४३७ | ३८० | २८१७ |
| | वर्ग-४ | १४८४८ | १६५ | १५०१३ | १०७८१ | १२७ | १०९०८ | ४०६७ | ३८ | ४१०५ | ३४२ | - | ३४७२ |
| | एकूण महामंडळ | ९८७८० | २०८७२ | ११९६५२ | ८३२०० | १४९०३ | ९८१०३ | १५५८० | ५९६९ | २१५४९ | २७७९ | ३८० | ३१५९ |

अनुसूचित जमातीच्या कार्यरत असलेल्या अधिकारी/कमर्चाऱ्यांची स्थिती खालीलप्रमाणे आहे :-

| वर्ग | एकूण कार्यरत |
|---|---|
| वर्ग-१ | ०५ |
| वर्ग-२ | ३१ |
| वर्ग-३ राज्यसंवर्ग | १५९ |
| वर्ग-३ घटकसंवर्ग | ७६७१ |
| वर्ग-४ | ११०९ |
| एकूण | ८९७५ |

समितीची दिनांक २५ जून, २००९ रोजी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई सेंट्रल येथे बैठक घेण्यात आली. बैठकीच्या वेळी समितीने राज्यातील विविध प्रादेशिक कार्यालयांना

भेटी दिलेल्या आहेत. त्या भेटीच्या वेळी समितीला दिलेल्या आश्वासनांची माहिती मध्यवर्ती कार्यालयाला देण्यात आलेली नाही. अकोला प्रादेशिक कार्यालयाकडून मध्यवर्ती कार्यालयाकडे माहिती आली आहे काय अशी विचारणा केली असता राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अधिकारी यांनी समितीने अकोला विभागीय कार्यालयाला भेट दिली होती. त्याठिकाणच्या कामकाजाबद्दल समितीने नापसंती व्यक्त केली आहे असे समितीला सांगितले.

समितीने त्यावेळी जवळपास १०८ कर्मचाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यापैकी काही कर्मचारी निवृत्त झाले आहेत, काही हयात नाहीत. सुप्रीम कोर्टाच्या व महाराष्ट्र शासनाच्या आदेशाप्रमाणे विभागीय कार्यालयांनी कारवाई का केली नाही? श्री. मानकर यांची बोगस प्रमाणपत्राच्या आधारावर नेमणूक झाली होती. त्यानंतर ते सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांना ५० टक्के निवृत्तीवेतन देण्यात येत आहे आणि ५० टक्के निवृत्तीवेतन रोखून ठेवलेले आहे. त्याचप्रमाणे ५६ कर्मचाऱ्यांना निलंबित करण्याचे आदेश दिले होते. या समितीला विधानसभेची लहान प्रतिकृती समजले जाते. त्यामुळे समितीने दिलेल्या आदेशाचे पालन व्हावे अशी समितीची इच्छा आहे. समितीने दिनांक २७ जानेवारी २००९ ला अकोला प्रादेशिक कार्यालयाला भेट दिली. त्यावेळी काही कर्मचाऱ्यांना पदावनत करावे, काही कर्मचाऱ्यांना निलंबित करावे असे आदेश दिले होते. त्याप्रमाणे विभागीय नियंत्रकांनी कार्यवाही करण्याचे समितीला आश्वासन दिले होते. त्याप्रमाणे काही कर्मचाऱ्यांविरुध्द कारवाई केली आहे. परंतु कारवाईच्या चार दिवसानंतर त्या कर्मचाऱ्यांना पुन्हा कामावर घेतले आहे. विभागीय नियंत्रकांनी कोणाच्या प्रेशरखाली केलेली कारवाई रद्द केली अशी समितीने विचारणा केली असता महाव्यवस्थापक यांनी केलेल्या कारवाईच्या रिव्ह्यू घेतला गेला नाही. तेथील विभागीय नियंत्रक कारवाई करण्यास सक्षम होते. त्यामुळे त्यांनी कारवाई करावयास पाहिजे होती परंतु कारवाई करण्यात आलेली नाही.

अकोला विभागातील श्री. पाटकर यांच्याविरुध्द विभागीय कार्यालयाने कारवाई केली होती. परंतु ते कोर्टामध्ये गेले. कोर्टाने त्यांना १५ दिवसांची मुदत देऊन या कालावधीत त्यांच्याकडून खुलासा घेण्याचे आदेश दिले होते. त्यामुळे डीसीएमडी यांनी त्यांना कारणे दाखवा नोटीस दिली होती. परंतु १५ दिवस होण्यापूर्वीच विभागीय नियंत्रकांनी त्यांना कामावरून कमी केले. परंतु कोर्टाचा अवमान होऊ नये यादृष्टीकोनातून त्यांच्यावर निलंबनाची कारवाई केली आहे. सध्या त्यांचे प्रकरण प्रलंबित आहे. असे समितीला सांगितले. समितीने अनेक कर्मचाऱ्यांनी वैधता प्रमाणपत्र दिले नसल्यामुळे त्यांना कामावरून कमी करण्याचे आदेश दिले होते. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे काय, त्यांनी मुदतीमध्ये वैधता प्रमाणपत्र दिले नसल्यामुळे अशा कर्मचाऱ्यांना का कमी करण्यात आले नाही अशी विचारणा केली, त्यावर राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अधिकारी यांनी दिनांक दिनांक ३० जून २००४ रोजीच्या आणि दिनांक १५जून १९९५ च्या शासन निर्णयामध्ये असे नमूद केले आहे की, ज्या कर्मचाऱ्यांना व अधिकाऱ्यांना आरक्षित जागेवर भरती, बढती देण्यात आली असेल अशा कर्मचाऱ्यांना सेवेतून काढून टाकू नये. त्यांनी विशेष मागास प्रवर्गाचा दाखला सादर केल्यानंतर तो वैध ठरला तर

त्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना एसबीसीचा दर्जा द्यावा आणि त्यांची सेवा ज्येष्ठता १९९५ पासून गणली जावी आणि त्यांना अनुसूचित जमातीच्या जागेवर सामावून घ्यावे. असे सांगितले. समितीने १९९५ पूर्वीच्या कर्मचाऱ्यांना कामावरून कमी करता येत नाही, परंतु पदावनत करता येते. त्यावेळी दिलेल्या आश्वासनानुसार ११ कर्मचाऱ्यांना समितीच्या सूचनेनुसार पदावनत करण्यात आले आहे काय? असे समितीने मत व्यक्त केले असता महाव्यवस्थापक यांनी **विभागीय नियंत्रकांनी केलेल्या कारवाईचा आढावा घेतलेला नाही परंतु अकोला येथील विभागीय नियंत्रकांनी कार्यवाही केली नसेल तर कार्यवाही केली जाईल. असे समितीला आश्वासित केले.**

**प्रादेशिक कार्यालय-पुणे**

दिनांक २ जुलै २००९ रोजी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, प्रादेशिक कार्यालय, पूणे येथे झालेल्या बैठकीच्या वेळी पूढील प्रमाणे माहिती प्राप्त झाली :—

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामधील वर्ग-१, वर्ग-२ व वर्ग-३ राज्यस्तरीय पदांची भरती/बढती इत्यादीबाबतची कार्यवाही, रा.प.मध्यवर्ती कार्याल्य, मुंबई यांचेमार्फत केली जाते.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, पुणे विभागामध्ये वर्ग-३ (घटक संवर्ग) व वर्ग-४ मधील तांत्रिक/अतांत्रिक, वाहक/चालक इत्यादी अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी आरक्षण व अनुशेषानुसार भरण्यात आलेली पदे व अनुशेषाबाबतची माहिती खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे :—

| अ.क्र. | वर्ग | एकूण मंजूर पदे | | | अनुसूचित जमातीसाठी आरक्षण | | | डिसेंबर, २००७ अखेर भरलेली अनुसूचित जमातीची पदे | | | रिक्त पदे | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सरळ सेवा | खात्या मार्फत | एकूण | सरळ सेवा | खात्या मार्फत | एकूण | सरळ सेवा | खात्या मार्फत | एकूण | सरळ सेवा | खात्या मार्फत | एकूण |
| (१) | **तांत्रिक पदे** | | | | | | | | | | | | |
| | वर्ग-३ (घटक संवर्ग) | ११४ | ६५९ | ७७३ | ०७ | ४७ | ५४ | ०३ | ३१ | ३४ | ०४ | १६ | २० |
| | वर्ग-४ | ५०१ | ० | ५०१ | ३५ | ०० | ३५ | ३० | ०० | ३० | ०५ | ०० | ०५ |
| | एकूण | ६१५ | ६५९ | १२७४ | ४२ | ४७ | ८९ | ३३ | ३१ | ६४ | ०९ | १६ | २५ |
| (२) | **अतांत्रिक पदे** | | | | | | | | | | | | |
| | वर्ग-३ (घटक संवर्ग) | ४२५ | २३६ | ६६१ | २८ | १५ | ४३ | १६ | १५ | ३१ | १२ | ०० | १२ |
| | वर्ग-४ | ३०१ | ०७ | ३०८ | १२ | ०० | १२ | ०७ | ०० | ०७ | ०५ | ०० | ०५ |
| | एकूण | ७२६ | २४३ | ९६९ | ४० | १५ | ५५ | २३ | १५ | ३८ | १७ | ०० | १७ |
| | एकूण (१+२) | १३४१ | ९०२ | २२४३ | ८२ | ६२ | १४४ | ५६ | ४६ | १०२ | २६ | १६ | ४२ |
| ३ | वाहक | २३३६ | ० | २३३६ | १६३ | ०० | १६३ | १४३ | ०० | १४३ | २० | ०० | २० |
| ४ | चालक | २३९० | ० | २३९० | १६७ | ०० | १६७ | ५३ | ०० | ५३ | ११४ | ०० | ११४ |
| | एकूण (३+४) | ४७२६ | ० | ४७२६ | ३३० | ०० | ३३० | १९६ | ०० | १९६ | १३४ | ०० | १३४ |
| | एकूण (१+२+३+४) | ६०६७ | ९०२ | ६९६९ | ४१२ | ६२ | ४७४ | २५२ | ४६ | २९८ | १६० | १६ | १७६ |

समितीने मंजूर पदांपैकी वर्गनिहाय तांत्रिक/अतांत्रिक, वाहक/चालक यांची प्रत्येकी किती पदे अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आलेली आहेत त्यापैकी किती व कोणकोणती पदे भरण्यात आलेली आहेत व उर्वरित पदे रिक्त राहण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत. रिक्त पदे भरण्याबाबत आतापर्यंत काय कारवाई करण्यात आली आहे तसेच वर्ग-३ ची खात्यामार्फत १६ व सरळ सेवेने भरावयाची ४ पदे अशी एकूण २० पदे रिक्त आहेत. ही पदे भरण्यासाठी खात्यामध्ये कर्मचारी मिळत नाहीत का अशी समितीने विचारणा केली असता प्रादेशिक व्यवस्थापक यांनी कारागिर व हेड मॅकेनिकसाठी सात वर्षांचा अनुभव असा निकष आहे. कर्मचारी निकषात बसत नसल्यामुळे अडचण निर्माण होते. परंतु या पदांसाठी जाहिरात दिली आहे. ही पदे भरण्यासाठी आता पुन्हा प्रयत्न करण्यात येतील. असे समितीला सांगितले. समितीने ही पदे भरण्यासाठी प्रकल्प अधिकाऱ्यांकडून याद्या मागविल्या पाहिजेत. अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची निवड करून त्यांना तीन महिन्यांचे प्रशिक्षण देण्यात येईल.

सरळ सेवेच्या रिक्त जागा व खात्यामार्फत भरावयाच्या जागा अशा प्रकारे दोन जाहिराती दिल्या आहेत काय अशी विचारणा केली असता, प्रादेशिक व्यवस्थापक यांनी फक्त सरळ सेवेसाठी जाहिरात दिलेली आहे. ही पदे भरण्यासाठी कार्यवाही सुरू करीत आहोत. तसेच २००८ मध्ये परीक्षा घेतली आहे व बढती दिलेली आहे. याद्वारे सहायक कारागिराची सर्व पदे भरली आहेत. कारागिर 'क' मध्ये तांत्रिक पदातून २२ जणांना बढती दिलेली आहे. असे समितीला सांगितले.

समितीने प्रश्नावलीच्या अनुषंगाने राज्य मार्ग परिवहन महामंडळ, पुणे विभागामध्ये वर्ग-३ (घटक संवर्ग) च्या तांत्रिक पदांचा सरळसेवा भरतीने भरावयाच्या पदांमध्ये अनुसूचित जमातीचा ४ पदांचा अनुशेष आहे आणि खात्यामार्फत बढतीद्वारा भरावयाच्या १६ पदांचा अनुशेष आहे. अशी ही एकूण २० पदे रिक्त असल्याचे आपण यामध्ये दाखविले आहे. तर खात्यामार्फत भरावयाच्या १६ पदांबाबत काय स्थिती आहे. सरळ सेवेद्वारे वर्ग-३ व वर्ग-४ मध्ये जी ४ व ५ पदे रिक्त आहेत ती भरण्यासाठी पात्र उमेदवार सरळ सेवा भरतीमध्ये मिळत नाहीत का त्यासाठी काय प्रयत्न केले आहेत अशी विचारणा केली असता विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, पुणे यांनी या कार्यालयाकडे कारागीर 'क' ही एक वेगळी ग्रेड आहे आणि त्या पदावर बढती मिळण्याकरिता कनिष्ठ पदावर तीन वर्षे सेवा केली असली पाहिजे तसेच त्याचा अनुभव देखील जास्त असला पाहिजे. असे समितीला सांगितले.

समितीने जाहिरात काढून अनुसूचित जमातीचे उमेदवार मिळविण्याचा प्रयत्न करताना ज्या जिल्ह्यांमध्ये आदिवासी समाज जास्त आहे, आदिवासी जिल्हा म्हणून जे जिल्हे ओळखले जातात अशा जिल्ह्यांमध्ये उदा. गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा, नाशिकचा काही भाग या ठिकाणच्या वर्तमानपत्रांमध्ये देखील जाहिरात दिली पाहिजे तरच आपल्याला आदिवासी उमेदवार उपलब्ध होऊ शकतील. तसेच आदिवासी विकास विभागाचे, प्रकल्प अधिकारी यांच्याशी देखील यासाठी संपर्क साधला तरी आपल्याला त्यांच्याकडून

उमेदवार उपलब्ध होऊ शकतील तसेच दिलेल्या माहितीच्या आकडेवारीवरून असे दिसते आहे की, सरळसेवा भरतीची मंजूर पदे ६०६७ असून ९०२ पदे खात्यामार्फत बढतीने भरावयाची आहेत आणि त्यापैकी आदिवासींसाठी आरक्षित पदे सरळ सेवेची ४१२ आणि खात्यामार्फत भरावयाची पदे ६२ आहेत. त्यापैकी डिसेंबर, २००७ अखेर सरळ सेवेने २५२ पदे भरली असून त्यात १६० पदांचा अनुशेष आहे आणि खात्यामार्फत बढतीने भरावयाची ४६ पदे भरली असून त्यात १६ पदांचा अनु.जमातीचा अनुशेष आहे. अशा प्रकारे एकूण अनु. जमातीचा अनुशेष १७६ पदांचा आहे. आता आपण जी पदे अनु.जमातीच्या उमेदवारातून सरळ सेवेतून तसेच बढतीद्वारे भरली आहेत अशी २९८ पदे आहेत. त्या सर्व उमेदवारांची जातीची प्रमाणपत्रे जात पडताळणी समितीकडून मिळविलेले वैधता प्रमाणपत्र त्या त्या उमेदवारांनी सादर केलेले आहे काय अशी पुन्हा विचारणा केली असता विभागीय नियंत्रक यांनी डिसेंबर, २००७ अखेरपर्यंत सरळ सेवेतून तसेच बढतीने भरलेली २९८ पदांपैकी १९८ उमेदवारांकडून वैधता प्रमाणपत्र मिळालेली आहेत. जे उमेदवार १९९५ पूर्वी आपल्या सेवेत आलेले आहेत अशा ७९ कर्मचाऱ्यांकडून वैधता प्रमाणपत्र मिळालेले आहे. तसेच १९९५ नंतर सेवेत लागलेल्या कर्मचाऱ्यांकडून त्यांच्या जातीचे प्रमाणपत्र जात पडताळणी समितीकडे प्रलंबित असलेल्यांची संख्या २४ आहे असे सांगितले.

समितीने या संबंधात शासनाचा आणि सुप्रीम कोर्टाचा निर्णय काय आहे. १९९५ नंतर सेवेत आलेल्या कर्मचाऱ्यांकडून त्याच्या जातीचे वैधता प्रमाणपत्र सहा महिन्यांच्या आत सादर केले गेले नाही तर त्याला सेवेतून कमी केले पाहिजे, तसेच १९९५ पूर्वी सेवेत असलेल्यांना प्रमोशन दिले असल्यास आणि त्यांनी जात पडताळणीचा दाखला सहा महिन्यांत सादर केला नसल्यास त्यांना पदावनत करावे असा शासनाचा निर्णय आहे आणि सुप्रीम कोर्टाचा देखील निर्णय आहे. तेव्हा अशा लोकांना आपल्या सेवेतून कमी करण्याची तसेच पदावनत करण्याची कारवाई करावी तसेच १९९५ नंतर सेवेत आलेले असे किती अनु.जमातीचे उमेदवार आहेत की ज्यांनी जात पडताळणी समितीचा दाखला सादर केलेला नाही तसेच असा दाखला सादर न करताच पदोन्नती मिळविलेली आहे. व १९९५ पूर्वीचे किती कर्मचारी आहेत अशा कर्मचाऱ्यांच्याबाबतीत सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानुसार व शासनाच्या निर्णयानुसार कोणती कारवाई करण्यात येणार आहे अशी विचारणा केली असता राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अधिकारी यांनी समितीला असे सांगितले की, १९९५ नंतरची तीन प्रकरणे होती, त्या तिघांनाही यापूर्वीच कामावरून कमी केलेले आहे. तसेच या २९८ पदांपैकी १५ जून १९९५ पूर्वी नेमलेल्या व जात प्रमाणपत्र वैध ठरलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या २०१ आहे. त्यानंतर १९९५ पूर्वी नेमणूक असलेल्या ३ कर्मचाऱ्यांनी त्यांचे जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी योग्य ती कागदपत्रे सादर न केल्याने आरोपपत्र दिल्यानंतर सादर केली व ती सर्व कागदपत्रे जात पडताळणी समितीकडे तपासणीसाठी पाठविण्यात आली आहेत. तसेच १५ जून १९९५ पूर्वी नेमलेल्या व जात प्रमाणपत्र अवैध ठरल्याप्रकरणी माननीय उच्च न्यायालयाच्या

निर्णयानुसार कार्यरत असलेले असे ६ कर्मचारी आहेत. तसेच मागणी करुनही जात प्रमाणापत्र पडताळणीसाठी कागदपत्रे सादर न केलेले असे २ कर्मचारी आहेत आणि १५ जून १९९५ नंतर नेमलेल्या व जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी कागदपत्रे सादर न केलेले असे २ कर्मचारी आहेत. याबाबत पुन्हा तपासणी करुन, खात्री करुन घेऊन अशी काही प्रकरणे असल्यास समितीने सांगितलेली कारवाई करुन त्याचा अहवाल समितीला सादर करण्यात येईल असे समितीला आश्वासित केले.

विभागीय सचिवांची साक्ष

अनुसूचित जमाती कल्याण समितीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या राज्यातील अकोला, यवतमाळ, कुर्ला (मुंबई), पुणे येथील प्रादेशिक कार्यालय व मध्यवर्ती कार्यालय मुंबई सेंट्रल येथे बैठका घेऊन या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचाऱ्यांचे आरक्षण, बढती, पदोन्नती, अनुशेष व जात पडताळणी इत्यादी बाबींवर चर्चा करुन आढावा घेण्यात आला. उक्त बैठकीच्या वेळी समितीला आढळून आलेल्या त्रुटीच्या संदर्भात व समितीला दिलेल्या आश्वासीत माहितीच्या अनुषंगाने एकत्रितरित्या समितीने दिनांक ३ जून २०१० रोजी सचिव, परिवहन विभाग, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ व प्रादेशिक कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्याची साक्ष घेण्यात आली.

विभागीय सचिवांच्या साक्षीच्या बैठकीच्या वेळी समितीला महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई यांच्याकडून पुढील प्रमाणे लेखी स्वरुपात माहिती प्राप्त झाली.

अनुसूचित जमाती कल्याण समितीने, रा.प.अकोला विभागास दिनांक २७ जानेवारी २००९ रोजी, रा.प. मुंबई प्रादेशिक कार्यालय येथे दिनांक २७ फेब्रुवारी २००९ रोजी, रा.प. यवतमाळ विभाग येथे दिनांक २ मार्च २००९ रोजी व पुणे विभागास दिनांक २ जुलै २००९ रोजी प्रत्यक्ष भेट देऊन वर्ग ३ घटकसंवर्ग या प्रवर्गातील अनुसूचित जमातीच्या पदांची मंजूर संख्या, भरलेली पदे, बिंदू नामावली, जात पडताळणी इत्यादीबाबत आढावा घेतला होता. यामध्ये, पुढील विभागांचा समावेश होता. मुंबई प्रदेशातील (१) मुंबई, (२) ठाणे, (३) पालघर, (४) रायगड, (५) रत्नागिरी, (६) सिंधुदुर्ग व अमरावती प्रदेशातील (७) यवतमाळ, (८) अकोला आणि पुणे प्रदेशातील (९) पुणे.

अनुसूचित जमाती कल्याण समितीने आढावा घेतलेल्या मुद्दयांमध्ये प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश होता (१) सरळसेवा भरती वर्ग-३ घटकसंवर्ग अनुसूचित जमातीची मंजूर व भरलेली पदे व खातेबढती वर्ग-३ घटकसंवर्ग अनुसूचित जमातीची मंजूर पदे व भरलेली पदे, (२) अनुसूचित जमातीच्या जागांची वृत्तपत्रांमध्ये जाहिरात देणे व प्रकल्प अधिकाऱ्यांना कळविणे, (३) बिंदूनामावल्या तपासून घेणे व अद्ययावत ठेवणे, (४) अनुसूचित जमातीचे जे अधिकारी/कर्मचारी जात पडताळणीसाठी लागणारी कागदपत्रे सादर करीत नाहीत, त्यांचेवर कारवाई करणे, (५) विभागात मागासवर्गीय कक्ष कार्यरत असणे.

# सरळसेवा भरती

विभाग निहाय अनुसूचित जमातीच्या वर्ग ३ घटकसंवर्ग मधील अनुसूचित जमातीची मंजूर पदे, अनुसूचित जमातीचे कार्यरत कर्मचाऱ्यांची संख्या व रिक्त पदांची संख्या (डिसेंबर, २००८ ची स्थिती) तसेच जून, २००९ मध्ये निवड केलेल्या अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची संख्या खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र. (१) | विभाग (२) | मंजूर (३) | कार्यरत (४) | रिक्त (५) | रिक्त पदे भरण्यासाठी केलेली कार्यवाही (६) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | मुंबई विभाग | १६६ | १३० | ३६ | सरळसेवा भरतीची अनुसूचित जमातीची पदे भरण्याबाबत माहे जून, २००९ मध्ये निवड केलेल्या उमेदवारांचा तपशील. | | |
| | | | | | पदाचे नांव | अनुसूचित जमातीच्या जाहिर केलेल्या पदांची संख्या | अनुसूचित जमातीचे निवडेलेल्या उमेदवारांची संख्या |
| | | | | | चालक | १७ | ०१ |
| | | | | | वाहक | १० | ०८ |
| | | | | | प्रमुख कारागिर (क) | ०१ | - |
| | | | | | कारागिर (क) | ०३ | - |
| | | | | | लिपिक | ०६ | ०२ |
| | | | | | **एकूण** | **३७** | **११** |
| (२) | ठाणे विभाग | ६९९ | २५८ | ४४१ | चालक | ८१ | २२ |
| | | | | | वाहक | ७६ | ८४ |
| | | | | | प्रमुख कारागिर (क) | ०१ | ०१ |
| | | | | | कारागिर (क) | ०५ | ०१ |
| | | | | | सहाय्यक | १२ | १३ |
| | | | | | लिपीक | १२ | १२ |
| | | | | | **एकूण** | **१८७** | **१३३** |
| | | | | | टिप : एकूण रिक्त जागांपैकी सरळसेवेने भरण्यासाठी कमी जागा घोषित करण्याचे कारण पृष्ठ क्र. २३ वर नमूद केले आहे. | | |
| (३) | पालघर विभाग | ४९९ | ३१६ | १८३ | चालक | ६७ | ०४ |
| | | | | | वाहक | ३४ | ३३ |
| | | | | | प्रमुख कारागिर (क) | - | - |
| | | | | | कारागिर (क) | ०३ | - |
| | | | | | सहायक | - | - |
| | | | | | लिपीक | ०८ | ०८ |
| | | | | | **एकूण** | **११२** | **४५** |
| | | | | | टिप : एकूण रिक्त जागांपैकी सरळसेवेने भरण्यासाठी कमी जागा घोषित करण्याचे कारण पृष्ठ क्र. २३ वर नमुद केले आहे. | | |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | | (६) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (४) | रायगड विभाग | २२८ | १४६ | ८२ | चालक | १० | – |
| | | | | | वाहक | ०९ | ०८ |
| | | | | | प्रमुख कारागिर (क) | ०१ | – |
| | | | | | कारागिर (क) | ०२ | – |
| | | | | | सहायक | ०२ | ०२ |
| | | | | | लिपिक | – | – |
| | | | | | **एकूण** | २४ | १० |
| | | | | | टिप : एकूण रिक्त जागांपैकी सरळसेवेने भरण्यासाठी कमी जागा घोषित करण्याचे कारण पृष्ठ क्र. २३ वर नमुद केले आहे. | | |
| (५) | रत्नागिरी विभाग | २३९ | १४३ | ९६ | चालक | १३ | ०४ |
| | | | | | वाहक | १८ | २० |
| | | | | | प्रमुख कारागिर (क) | – | – |
| | | | | | कारागिर (क) | ०१ | – |
| | | | | | सहायक | ०६ | ०७ |
| | | | | | लिपिक | ०२ | ०२ |
| | | | | | **एकूण** | ४० | ३३ |
| | | | | | टिप : एकूण रिक्त जागांपैकी सरळसेवेने भरण्यासाठी कमी जागा घोषित करण्याचे कारण पृष्ठ क्र. २३ वर नमुद केले आहे. | | |
| (६) | सिंधुदूर्ग विभाग | १४३ | ४५ | ९८ | चालक | ०४ | – |
| | | | | | वाहक | ०८ | ०९ |
| | | | | | प्रमुख कारागिर (क) | – | – |
| | | | | | कारागिर (क) | ०१ | – |
| | | | | | सहायक | ०७ | ०८ |
| | | | | | लिपिक | ०५ | ०४ |
| | | | | | **एकूण** | २५ | २१ |
| | | | | | टिप : एकूण रिक्त जागांपैकी सरळसेवेने भरण्यासाठी कमी जागा घोषित करण्याचे कारण पृष्ठ क्र. २३ वर नमुद केले आहे. | | |
| (७) | अकोला विभाग | १५४ | १५१ | ०३ | रिक्त जागा अत्यल्प असल्याने भरतीबाबतची कार्यवाही करण्यात आलेली नाही | | |
| (८) | यवतमाळ विभाग | ३४९ | २८८ | ६१ | वाहक | ०६ | ०७ |
| | | | | | प्रमुख कारागिर (क) | ०१ | – |
| | | | | | कारागिर (क) | ०२ | – |
| | | | | | सहायक | १२ | १३ |
| | | | | | लिपिक | ०४ | ०४ |
| | | | | | **एकूण** | २५ | २४ |
| | | | | | टिप : एकूण रिक्त जागांपैकी सरळसेवेने भरण्यासाठी कमी जागा घोषित करण्याचे कारण पृष्ठ क्र. २३ वर नमुद केले आहे. | | |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (९) | पुणे विभाग | ३६५ | २२९ | १३६ | चालक | १४ | ०१ |
| | | | | | वाहक | २३ | २३ |
| | | | | | कारागिर (क) | ०२ | - |
| | | | | | एकूण | ३९ | २४ |
| | | | | | टिप : एकूण रिक्त जागांपैकी सरळसेवेने भरण्यासाठी कमी जागा घोषित करण्याचे कारण पृष्ठ क्र. २३ वर नमुद केले आहे. | | |

टिप : रिक्त जागांपेक्षा कमी जागा भरण्यासाठी जाहिरातीतून घोषित करण्याचे कारण पुढीलप्रमाणे आहे.

(१) वर्ग-३ घटकसंवर्गामध्ये एकूण ४७ प्रवर्ग आहेत. यापैकी फक्त चालकासाठी आवश्यक असलेले प्रवर्ग जसे चालक, वाहक, प्रमुख कारागिर, कारागिर 'क', सहायक व लिपिक-टंकलेखक या ६ प्रवर्गात भरती करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याचप्रमाणे चालक, वाहक या प्रवर्गातील सर्व पदे आणि प्रमुख कारागिर व कारागिर 'क' व लिपीक-टंकलेखक या प्रवर्गातील रिक्त जागांच्या ५० टक्के व सहायक प्रवर्गातील रिक्त जागांच्या ७५ टक्के पदे भरण्याचा निर्णय घेण्यात आला. **चालकीय पदाची आवश्यकता, रा.प.महामंडळाची आर्थिक स्थिती, उत्पादकता, उत्पन्न मिळण्याची अपेक्षा इत्यादी बाबी विचारात घेऊन सदरचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे एकूण रिक्त जागा आणि भरण्यासाठी घोषित केलेल्या रिक्त जागा यामध्ये तफावत आहे.**

पदोन्नती

विभाग निहाय अनुसूचित जमातीच्या वर्ग-३ घटकसंवर्गातील पदोन्नतीसाठी असलेल्या मंजूर पदांची संख्या कार्यरत असलेल्या अनुसूचित जमातीच्या कर्मचाऱ्यांची संख्या, अनुसूचित जमातीची रिक्त पदे तसेच रिक्त पदे पदोन्नतीने भरण्यासाठी केलेली कार्यवाही खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे. दिनांक १ जानेवारी, २००८ ते दिनांक ३० जून २००९ या कालावधीत अनुसूचित जमातीच्या कर्मचाऱ्यांना दिलेल्या बढतीचा तपशील खाली देण्यात आला आहे.

| अ.क्र. (१) | विभाग (२) | मंजूर (३) | कार्यरत (४) | रिक्त (५) | रिक्त पदे भरण्यासाठी केलेली कार्यवाही (६) | |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | मुंबई विभाग | ३० | २३ | ०७ | सन २००८ मध्ये कारागिर "क" मध्ये एका उमेदवारास बढती देण्यात आलेली आहे. वरिष्ठ लिपिक साठी वैधता प्रमाणपत्रधारक कर्मचारी उपलब्ध नाही. सहा. वाहतूक निरीक्षकांसाठी अनुसूचित जमातीचे उमेदवार उपलब्ध नाहीत. तरीही खाली दर्शविल्याप्रमाणे पदोन्नती देण्यासाठी सध्या कार्यवाही सुरू आहे. | |
| | | | | | वरिष्ठ लिपिक | ०२ |
| | | | | | प्रमुख कारागिर | ०१ |
| | | | | | कारागिर 'क' | ०२ |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | सहा.वाह.निरीक्षक ०१<br>वाहतूक नियंत्रक ०१<br>**एकूण ०७** |
| (२) | रायगड विभाग | ४२ | २४ | १८ | सन २००८ मध्ये सहा.कारागिर पदी एका उमेदवारास बढती देण्यात आलेली आहे. इतर प्रवर्गात अनुसूचित जातीच्या प्रमाणपत्राची वैधता प्राप्त न झाल्यामुळे बढती देता आलेली नाही. परंतु याबाबत पाठपुरावा करून बढतीबाबतची कार्यवाही करण्यात येईल. |
| ३) | रत्नागिरी विभाग | ४५ | ०९ | ३६ | सन २००८ मध्ये कारागिर "क" पदी एका कर्मचाऱ्यास बढती देण्यात आलेली आहे. इतर प्रवर्गात उमेदवार उपलब्ध न झाल्यामुळे बढती देता आलेली नाही. तरीही पुन्हा बढती परीक्षा/चाचणी परीक्षा आयोजित करुन बढती देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल. |
| ४) | सिंधुदूर्ग विभाग | ३० | ११ | १९ | सध्या अनुसूचित जमातीचे ३ वाहतूक नियंत्रक बढती परीक्षा पास झालेले आहेत. पैकी २ कर्मचाऱ्यांवर कोर्ट प्रकरण चालू आहे व त्यांची जात पडताळणी झाली नाही. एका कर्मचाऱ्याची जात पडताळणी झाली असून सध्या जागा उपलब्ध नसल्यामुळे बढती देण्यात आलेली नाही. परंतु जागा उपलब्ध होताच त्यांना बढती देण्यात येईल. त्याचप्रमाणे अनुसूचित जातीचे एक सहायक कारागिर हे कारागिर "क" पदाची बढती परीक्षा पास झाले असून सध्या जागा उपलब्ध नसल्यामुळे बढती देता आली नाही. परंतु जागा उपलब्ध होताच बढती देण्यात येईल. |
| ५) | अकोला विभाग | ३४ | २९ | ०५ | बढती परीक्षा आयोजित करणेबाबत लवकर कार्यवाही करण्यात येईल. |
| ६) | यवतमाळ विभाग | ३० | १२ | १८ | सन २००८ मध्ये कारागिर "क" पदी २ कर्मचाऱ्यांना बढती देण्यात आली. तसेच सहायक कारागिर पदी २ कर्मचाऱ्यांना बढती देण्यात आली. एका कर्मचाऱ्यांने पदोन्नती नाकारली आहे. एका कर्मचाऱ्याचे जात वैधता प्रमाणपत्र नसल्यामुळे पदोन्नती देण्यात आलेली नाही. फेर बढती परीक्षा घेण्यात येईल. |
| ७) | पुणे विभाग | ६२ | ५६ | ०६ | सन २००९ मध्ये कारागिर "क" पदी ९ कर्मचाऱ्यांना बढती देण्यात आलेली आहे. |

अनुसूचित जमाती कल्याण समितीने आयोजित केलेल्या बैठकीत, अनुसूचित जमातींचे एकूण किती कर्मचारी कार्यरत आहेत. त्यांची जात पडताळणी झाली आहे किंवा काय, जात पडताळणी झाली असल्यास, वैध किती व अवैध किती. जात पडताळणी समितीकडे पडताळणीकरिता किती प्रकरणे प्रलंबित आहेत. जात पडताळणी करिता अनुसूचित जमातींच्या किती कर्मचाऱ्यांना अद्यापपर्यंत कागदपत्रे सादर केलेली नाहीत, याबाबत वरील मुद्दयांच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे माहिती सादर करण्यात आली.

| विभाग | कर्मचारी संख्या | वैधता प्राप्त | अवैधता संख्या | तपासणी समितीकडे प्रलंबित संख्या | तपासणी कागदपत्रे सादर न केलेले | अवैध ठरलेल्यांवर केलेली कार्यवाही | | | | | कागदपत्रे सादर न केलेल्यावर कार्यवाही | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | १५-६-१९९५ नंतरचे | | १५-६-१९९५ पूर्वीचे | | | १५-६-९५ नंतरचे | | १५-६-९५ पूर्वीचे |
| | | | | | | सेवा समाप्त | न्याय प्रविष्ट | सेवा समाप्त | संरक्षण | पदावनती | सेवा समाप्त | ३ महिन्यात कागदपत्रे सादर करण्याची नोटीस दिली | ३ महिन्यात कागदपत्रे सादर करण्याची नोटीस दिली |
| मुंबई | १८५ | १२३ | ०६ | ०७ | ४९ | ०९ | - | ०२ | ०४ | - | - | ०४ | ४५ |
| पालघर | ४६४ | ४१४ | ०१ | २३ | २६ | - | - | - | ०१ | - | - | - | २६ |
| रायगड | २०२ | ९२ | ०३ | ६८ | ३९ | | - | - | ०३ | - | | - | ३९ |
| रत्नागिरी | १८४ | १३५ | ११ | ११ | २७ | ०८ | ०३ | - | - | - | - | ०९ | १८ |
| ठाणे | ३९७ | ३१६ | १६ | ३८ | २७ | ०६ | - | - | १० | | - | - | २७ |
| सिंधुदुर्ग | ५० | ३१ | ०१ | ०९ | ०९ | - | - | - | ०१ | - | ०५ | | ०४ |
| अकोला | २३६ | २० | १६ | १७ | १८३ | ०५ | ०३ | - | ०३ | ०५ | - | ०४ | १७९ |
| यवतमाळ | २२६ | १६९ | ०३ | - | १२४ | - | - | - | ०२ | ०१ | - | ५१ | ७३ |
| पुणे | २८५ | २२९ | ०२ | ०३ | ५१ | - | ०२ | - | - | - | - | १४ | २२ |

**टिप :** जे अनुसूचित जमातींचे अधिकारी/कर्मचारी जात पडताळणीसाठी आवश्यक असणारी कागदपत्रे सादर करीत नाहीत किंवा ज्यांची जात प्रमाणपत्रे अवैध ठरली आहेत त्यांच्याबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करण्यासाठी परिपत्रक क्र. २९१०, दिनांक १५ जुलै, २००९ अन्वये खालीलप्रमाणे

सूचना देण्यात आलेल्या आहेत.—

(१) ज्यांची नियुक्ती/पदोन्नती दि. १५ जून १९९५ नंतर झालेली आहे व ज्यांनी अद्याप पर्यंत कागदपत्रे सादर केली नाहीत त्यांना ३ महिन्याची नोटीस देऊन कागदपत्रे सादर करण्यास सांगण्यात येईल. कागदपत्रे सादर केली नाहीत तर १ महिन्याची कारणे दाखवा नोटीस देऊन अशांना सेवेतून कमी करण्यात यावे किंवा पदावनत करण्यात यावे.

(२) ज्यांची नियुक्ती/पदोन्नती दि. १५ जून १९९५ पूर्वीची आहे व ज्यांनी अद्याप पर्यंत कागदपत्रे सादर केली नाहीत त्यांना सुध्दा ३ महिन्याची नोटीस देऊन कागदपत्रे सादर करण्यास सांगण्यात येईल. या मुदतीत त्यांनी कागदपत्रे सादर केली नाहीत तर त्यांची सेवा ज्येष्ठता दि. १५ जून १९९५ पासून ग्राह्य धरण्यात येईल. भविष्यात त्यांना जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय नियमित अथवा तात्पुरती बढती देण्यात येणार नाही. दि. १५ जून १९९५ नंतर जर तात्पुरती/नियमीत बढती देण्यात आली असेल तर त्यांना त्वरित पदावनत करण्यात येईल.

(३) ज्यांची जात प्रमाणपत्रे अवैध ठरली आहेत व जे दि. १५ जून १९९५ नंतरचे आहेत त्यांना पदावनत/सेवा समाप्ती करण्यात येईल. जे दि. १५ जून १९९५ पूर्वीचे आहेत त्यांच्या बाबतीत दि. १५ जून १९९५ ची स्थिती कायम ठेवण्यात येईल.

(४) वर नमुद केल्याप्रमाणे सेवा समाप्त केल्यामुळे किंवा पदावनत केल्यामुळे रिक्त होणारी पदे अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधून भरण्याबाबत त्वरित कार्यवाही करण्यात येईल.

उपरोक्त प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक ३ जून २०१० रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. विभागीय साक्षीच्या बैठकीच्या वेळी समितीने विविध विभागांना भेटी देत असताना राज्य परिवहन महामंडळाच्या अकोला विभागात दिनांक २७ जानेवारी २००९ रोजी भेट दिली होती. यवतमाळ विभागाला दिनांक २ मार्च २००९ मध्ये आणि पुणे विभागाला दिनांक २ जुलै २००९ रोजी भेट दिली होती. या भेटींमध्ये वर्ग-३ व वर्ग-४ या प्रवर्गातील अनुसूचित जमातीची एकूण मंजूर पदे, बिंदुनामावली अद्ययावत केलेली आहे की नाही यासंबंधीचा आढावा घेण्यात आला. या बैठकीत एकूण पाच विषयांच्या बाबतीत चर्चा करण्यात आली होती. त्यात प्रामुख्याने सरळ सेवा भरती अंतर्गत एस.टी साठी मंजूर पदे किती, भरलेली पदे किती तसेच बढतीच्या संदर्भात चर्चा झाली होती. दुसरा मुद्दा असा होता की, एस.टी.प्रवर्गाच्या बाबतीत जाहिरात देणे व प्रकल्प अधिकाऱ्यांना कळविणे, बिंदुनामावली अद्ययावत ठेवणे व जात पडताळणीसाठी लागणारी कागदपत्रे सादर करीत नाहीत त्यांच्यावर कारवाई करणे व मागासवर्ग कक्ष कार्यरत ठेवणे या पाच मुद्यांच्या बाबतीत चर्चा झाली होती.

अकोला प्रादेशिक कार्यालयाच्या संदर्भात एकूण १५४ पदे मंजूर होती व त्यापैकी १५१ पदे कार्यरत आहेत आणि ३ पदांचा अनुशेष होता त्यासाठी जाहिरात दिलेली आहे. तसेच साक्षीच्यावेळी पुरविण्यात आलेल्या माहितीवरुन समितीच्या असेही निदर्शनास आले आहे की, अनुसूचित जमातीच्या वर्ग-३

संवर्गातील ९ विभागात एकूण ११३६ पदे रिक्त आहेत. तसेच सरळ सेवाद्वारे जून, २००९ मध्ये निवड करण्यात आलेल्या अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची संख्या ९ विभागामध्ये एकूण ३०१ आहे. नुकतीच आम्ही १७५०० पदांची भरती करणार आहोत. असे महाव्यवस्थापक यांनी समितीला सांगितले.

शासनाच्या सहायक आयुक्त बी.सी.सेल यांच्याकडून रोष्टर अद्ययावत करुन घेतल्याचे समितीला प्रत्येक ठिकाणी दिसून आले नाही. कुर्ला डेपोला भेट दिली असता आम्हाला तेथे कॉन्ट्र्व्हर्सी उत्तरे देण्यात आली. तसेच समितीसमोर चुकीची माहिती दिली यावर व्यवस्थापकीय संचालक यांनी झालेल्या प्रकरणी त्याची दखल घेऊन योग्य ती कारवाई करण्यात येईल असे आश्वासित केले आहे. तसचे या महामंडळाकडील एकूण ३० विभागांपैकी प्रत्येक विभागात बी.सी.सेल कार्यरत आहे. त्यातील प्रत्येक केडरचा जो अनुशेष असतो तो भरला की नाही याबाबतचे स्पष्टीकरण सेंट्रल कार्यालयाकडे द्यावे लागते. अकोला विभागीय कार्यालयातील एस.टी. च्या अनुशेषाबाबत शासनाला कळविले असता, त्या अनुषंगाने काही चुका निदर्शनास आल्या होत्या त्यांची पुर्तता करून पुन्हा शासनाकडे पाठविले आहे तसेच आता जिल्हानिहाय जागा भरण्याचा विचार केला आहे. अशी समितीला माहिती दिली.

समितीने आयुक्तालयाच्या ठिकाणी शासनाचा जो बी.सी.सेल कार्यरत असतो तो सहायक आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली असतो. त्या सेलमार्फत बिंदुनामावली अद्ययावत करुन घेणे आवश्यक असते. आपण आता माहिती देत असताना आपल्या विभागात असा सेल कार्यरत असल्याची माहिती देत आहात, त्यामुळे हे समितीला अवघड होत आहे. परंतु संपूर्ण रोष्टरची तपासणी अद्ययावत करुन ती आपल्या विभागातील मागासवगीर्य कक्षामार्फत न करता आयुक्तालयाच्या ठिकाणी कार्यरत असलेल्या मागासवगीर्य कक्ष आहे. त्या कक्षाकडून आपल्या संपूर्ण विभागामधील पदांचा अनुशेष तसेच बिंदूनामावली अद्ययावत करून घेतला आहे काय अशी विचारणा केली असता, महाव्यवस्थापकीय संचालक यांनी शासनाच्या सेलमार्फत बिंदुनामावली अद्ययावत करुन घेण्यासंबंधीच्या सूचना करण्यात येतील. अशा प्रकारे बिंदुनामावली पूर्ण करुनच भरती प्रक्रिया पूर्ण करण्याचा विचार केला जाईल असे समितीला आश्वासित केले.

समितीला प्रत्येक जिल्ह्यात गेल्यानंतर ही भरती केंद्रिय पद्धतीने करण्यात येते अशी माहिती देण्यात आली. त्यामुळे त्या त्या जिल्हयातील आदिवासी उमेदवारांवर अन्याय होतो व अनेक ठिकाणचा अनुशेष शिल्लक राहतो असे समितीला आढळून आले. कुर्ला डेपोला भेट दिली असता तेथे तर आम्हाला अत्यंत चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली. तसेच केंद्रिय पद्धतीने आपण भरती करीत असल्याने गडचिरोली व गोंदिया विभागातील आदिवासींवर त्यामुळे अन्याय होतो. कारण या भागात आदिवासींचे प्रमाण जास्त आहे. त्यांना फायदा मिळत नाही म्हणून जिल्हानिहाय भरती केली तर खऱ्या आदिवासींना न्याय मिळू शकेल.

समितीच्या असेही निदर्शनास आले आहे की, त्या त्या जिल्ह्यातील आदिवासी उमेदवार न घेता सर्वच जिल्ह्यातील उमेदवार बोलावले जातात त्यामुळे त्या त्या जिल्ह्यातील आदिवासींवर अन्याय होतो. तेव्हा शासनाच्या पातळीवरुन कारवाई केली तर जिल्हानिहाय हा अनुशेष भरला जाऊ शकतो.

एखाद्या जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यात बदली करीत असताना त्या जिल्ह्यातील आरक्षित जागांचा विचार करणे आवश्यक आहे. व टीएसपीच्या भागात बदली करताना तेवढया पुरती ही अट मान्य करण्यात यावी असे समितीचे मत आहे. त्यावर महाव्यवस्थापक यांनी विभागीय नियंत्रक यांच्यामार्फत रिक्त पदांची संख्या निश्चित केल्यानंतर त्यानुसार रिक्त पदे भरण्यासाठी महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यालयाकडून शासनाकडे प्रस्ताव सादर केला जातो. शासनाच्या मान्यतेनंतर मध्यवर्ती कार्यालयाकडून भरतीची प्रक्रिया सुरू केली जाते. सध्या पालघर व ठाणे विभागामध्ये २५ आदिवासी कर्मचारी जादा झालेले आहेत.

ज्या प्रवर्गाचे लोक ज्या जिल्ह्यात मोठया संख्येने असतील तेथे त्याच प्रवर्गाच्या उमेदवारांची भरती झाली पाहिजे. आदिवासी उमेदवारांसाठी राखीव असलेल्या जागेवर त्याच जिल्ह्यातील आदिवासी उमेदवाराची नेमणूक झाली पाहिजे. परंतु महामंडळाने केंद्रिय पद्धतीने नोकर भरती केलेली आहे त्यात बदल होणे आवश्यक आहे असे समितीने मत व्यक्त केले.

**मुंबई विभाग :**

मुंबई विभागातील अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या १७ चालकांच्या पदांपैकी १६ पदे रिक्त आहेत. ही पदे केव्हा भरली जाणार आहेत? अशी समितीने विचारणा केली असता, महाव्यवस्थापक यांनी मुंबई विभागामध्ये १८ चालकांची पदे अनुसूचित जमातीसाठी राखीव आहेत. मुंबई विभागामध्ये भरतीची प्रक्रिया सुरु झालेली आहे. दिनांक ११ एप्रिल रोजी एकूण उमेदवारांपैकी अर्ध्या उमेदवारांची परीक्षा झाली आहे आणि अर्ध्या उमेदवारांची परीक्षा ९ जुलै रोजी होणार आहे. अनुसूचित जमातीची एकूण संख्या ४३४ आहे यामध्ये चालकांच्या पदांची संख्या ३८४, कारागीर 'क' पदांची संख्या २१, सहायक वाहतूक निरीक्षकांची ३ पदे आणि सहाय्यकांची २६ पदे समाविष्ट आहेत असे समितीला सांगितले.

राज्यामध्ये अनेक जिल्ह्यांमध्ये अनुसूचित जमाती या प्रवर्गातील पदांचे प्रमाण वेगवेगळे आहे. काही जिल्ह्यांमध्ये २२ टक्के आहे, काही जिल्ह्यात १४ टक्के आहे ठाणे जिल्हयासाठी २२ टक्के आहे. भरतीची प्रक्रिया कशाप्रकारे अवलंबिली जाते, आरक्षण निश्चित करण्याची पध्दती कशी आहे पदांची संख्या कशाच्या आधारे निश्चित केली जाते अशी समितीने विचारणा केली असता, वाहक व चालकांची वेगळी कॅटेगरी आहे. या दोन संवर्गामध्ये जादा कर्मचाऱ्यांची गरज असते. भविष्यामधील गाडयांचे वेळापत्रक तयार करून त्यासाठी लागणाऱ्या या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना गरजेप्रमाणे रोजंदारीवर घेतले जाते. ज्यावेळी गरज नसते त्यावेळी मात्र त्यांना घेतले जात नाही. असे महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी समितीला सांगितले.

समितीने वाहक व चालक या प्रवर्गापैकी वाहकाला बॅज काढावा लागतो आणि चालकाला वाहन चालविण्याचे प्रशिक्षण घ्यावे लागते. राज्यात आदिवासी उपयोजना बाह्य क्षेत्रातील आदिवासींची संख्या कमी आहे. परंतु आदिवासी उपयोजना क्षेत्रात आदिवासी भागातील लोक किंवा या प्रवर्गात मोडणाऱ्या

समाजातील लोक चालकाचे प्रशिक्षण घेऊ शकतात. परंतु आदिवासी उपयोजनाबाहय (ओटीएसपी) क्षेत्रात आदिवासींची संख्या कमी आहे व त्यांना प्रशिक्षण मिळण्याची सोय नसल्यामुळे ते चालक होऊ शकत नाहीत. या समाजातील मुलांसाठी प्रशिक्षणाची सोय होणे आवश्यक आहे. पारधी, भिल्ल, महादेव कोळी या समाजाची लोकसंख्या कमी आहे. त्यामुळे आदिवासी उपयोजनाबाहय क्षेत्राच्या (ओटीएसपी) भागामध्ये अनुसूचित जमाती च्या लोकांसाठी काही विशिष्ट योजना राबविता येतील काय अशी समितीने पुन्हा विचारणा केली त्यावर महाव्यवस्थापकीय संचालक यांनी पांढरकवडा, गडचिरोली या दोन ठिकाणी चालकाचे प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षण केंद्र सुरू केले होते. तसेच त्याठिकाणी वसतीगृहाची सोय केली होती. प्रशिक्षणार्थींना मानधन दिले जात होते. या प्रशिक्षणार्थींचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांना सरळ महामंडळाच्या सेवेत घेण्याची व्यवस्था केली होती. तसेच त्यावेळी देखील प्रशिक्षणार्थींच्या मानधनाचा आर्थिक भार शासन उचलत होते. याबाबतची नवीन योजना तयार केली असून सध्या अचलपूर, परतवाडा आणि ठाणे जिल्ह्यामध्ये चालकाचे प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याचा प्रस्ताव पाठविलेला आहे. या प्रस्तावाला शासनाने मान्यता द्यावी असे सुचविले आहे असे सांगितले. समितीने एस.टी.महामंडळाने अशाप्रकारची योजना पुन्हा सुरू केली तर त्याचा चांगला उपयोग होऊ शकेल. एस.टी महामंडळाने प्रशिक्षण केंद्राबाबत शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावाला तातडीने मंजुरी द्यावी अशी समिती शासनाला शिफारस करील. परंतु त्याचबरोबर मराठवाड्यातील बीड, जालना, उस्मानाबाद या ठिकाणी सुद्धा अशी प्रशिक्षण केंद्रे सुरू करण्यात यावी असे समितीचे मत आहे. यावर महाव्यवस्थापक यांनी अशी सूचना केली की, प्रशिक्षण केंद्रे सुरू करण्यास हरकत नाही. परंतु मानधन देण्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. यावर समिती मानधनाच्या बाबतीत शासनाला शिफारस करील. परंतु चालकांबरोबर वाहक या पदासाठी सुद्धा प्रशिक्षण देण्याची सोय करण्यात यावी. प्रशिक्षण केंद्रे सुरू करण्यासाठी महामंडळाला निधी देण्याबाबत समिती शासनाला शिफारस करील. तसेच अचलपूर, परतवाडा व ठाणे या तीन प्रशिक्षण केंद्राचे प्रस्ताव शासनाकडे पाठविलेले आहेत. चौथा प्रस्ताव बीड जिल्ह्याचा सुद्धा तयार करून, तो शासनाकडे पाठवावा. इतकेच नव्हे तर ज्या ठिकाणी अनुसूचित जमातीचे लोक मोठया प्रमाणावर आहेत त्या ठिकाणी सुद्धा प्रशिक्षण केंद्रे सरू करावेत. असे समितीचे मत आहे. वाहक, चालक यांच्याबरोबर टर्नर, फिटर, वेल्डर या पदांवर नोकऱ्या मिळण्यासाठी अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना प्रशिक्षण दिले पाहिजे. हे लोक अप्रशिक्षित असल्यामुळे त्यांना या पदावर नोकरी मिळत नाही. यावर उपाय म्हणून या लोकांना प्रथम विविध डेपोच्या माध्यमातून प्रशिक्षण देण्याची योजना तयार करावी. म्हणजे आयटीआय बाहय किंवा शाळाबाहय उमेदवारांना या पदांवर नोकरी मिळण्यासाठी अशाप्रकारची योजना तयार करावी.

अनुसूचित जमातीच्या लोकांसाठी परिवहन विभागातर्फे प्रशिक्षण केंद्रे सुरू करण्यात येतील. परंतु त्यासाठी येणारा खर्च आदिवासी विकास विभागाने करावयास हवा असे विभागीय सचिवांनी समितीला सांगितले असता, आदिवासी विकास विभागाचा निधी खर्च न झाल्यामुळे वारंवार समर्पित करावा लागतो.

त्यामुळे परिवहन विभागातर्फे सुरू करण्यात येणाऱ्या प्रशिक्षण केंद्रासाठी आदिवासी विकास विभागाने निधी उपलब्ध करून द्यावा, अशा प्रकारची शिफारस समितीकडून करण्यात येईल असे समितीने मत व्यक्त केले.

अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील लोकांसाठी महामंडळाने मानवी दृष्टीकोन ठेवला पाहिजे. जे लोक वर्षानुवर्षे मुख्य प्रवाहात आलेली नाही. त्या जमातीतील उमेदवार आयटीआय उत्तीर्ण असण्याची अपेक्षा करता येत नाही. ते लोक अजून डोंगरावरच आहेत, डोंगराच्या खाली उतरलेले नाहीत. शिक्षण विभागामध्ये अप्रशिक्षित शिक्षक चालू शकतात तर मग आदिवासी समाजातील अप्रशिक्षित उमेदवार का चालत नाहीत. अप्रशिक्षित उमेदवारांना डेपोतून प्रशिक्षण दिले तर अनुसूचित जमातीच्या जागा भरल्या जातील. पाहिजे तर प्रथम त्यांना वेतन कमी द्यावे. पण त्यांना नोकरीत प्राधान्य द्यावे. तसेच ओटीएसपीबरोबर टीएसपी क्षेत्रासाठी सुद्धा योजना तयार करावी. कारण पूर्वीच्या जनगणनेनुसार राज्यात ८७ लाख अनुसूचित जमातीचे लोक आहेत. सध्या अनुसूचित जमातीतील ३५ लाख इतकी लोकसंख्या केवळ १६ जिल्ह्यांमध्ये आहे. उर्वरित ५२ लाख लोकसंख्या ओटीएसपी भागात राहते. ओटीएसपीतील अनुसूचित जमातीचे लोक विखुरलेले आहेत. त्यामुळे या लोकांना प्रशिक्षण देऊन न्याय देण्यात यावा तसेच टीएसपी आणि ओटीएसपी क्षेत्राचे नियोजन वेगवेगळे करावे. कारण नाशिक व ठाणे जिल्ह्यात अनुसूचित जमातीची लोकसंख्या मोठया प्रमाणावर आहे. त्यामुळे याकडे सुध्दा विभागाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. तसेच ज्या भागात अनुसूचित जमातीचा प्रवर्ग मोठया प्रमाणावर आहे त्या भागात चांगल्या अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या कराव्यात.

समितीने परिवहन विभागाकडून जी १७ हजार पदे भरण्यात येणार आहेत त्याच्या ७ टक्के पदे अनुसूचित जमाती प्रवर्गातून भरणार आहात काय? प्रत्येक जिल्ह्यामध्ये अनुसूचित जमातीच्या लोकांची टक्केवारी निरनिराळी आहे. शिवाय परिवहन विभागाने भरती विलंबाने केली आहे. वास्तविक पाहता समितीने भेट दिल्यानंतर, विभागाने भरती प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, अशी समितीची अपेक्षा होती. यावर महामंडळाचे अधिकारी यांनी असे सांगितले की एकत्रित पदांच्या आधारावर भरती करण्यात येणार नाही. आम्ही जिल्हानिहाय अनुशेष काढला आहे. माहिती पुस्तिकेमध्ये ४३४ पदांचा जो अनुशेष दाखविण्यात आलेला आहे तो ९ विभागाचा आहे. अनुशेष पुढीलप्रमाणे आहे.

सरळसेवा भरतीची अनुसूचीत जमातीची पदे भरण्याबाबत माहे जून, २००९ नंतर भरती करावयाच्या पदांचा तपशील

| अ.क्र. (१) | विभागाचे/पदाचे नांव (२) | अनुसूचित जमातीची संख्या (३) |
|---|---|---|
| १. | मुंबई विभाग | |
| | चालक | १८ |
| | कारागिर 'क' | ०२ |
| | सहा.वाहतूक निरीक्षक | ०१ |
| | सहाय्यक | निरंक |
| | एकूण | २१ |
| २. | ठाणे विभाग | |
| | चालक | १०१ |
| | कारागिर 'क' | ०६ |
| | सहा.वाहतूक निरीक्षक | निरंक |
| | सहाय्यक | १० |
| | एकूण | ११७ |
| ३. | पालघर विभाग | |
| | चालक | ९० |
| | कारागिर 'क' | ०३ |
| | सहा.वाहतूक निरीक्षक | ०१ |
| | सहाय्यक | ०२ |
| | एकूण | ९६ |
| ४. | रायगड विभाग | |
| | चालक | ३० |
| | कारागिर 'क' | ०२ |
| | सहा.वाहतूक निरीक्षक | निरंक |
| | सहाय्यक | ०१ |
| | एकूण | ३३ |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ५. | रत्नागिरी विभाग | |
| | चालक | २५ |
| | कारागिर 'क' | ०२ |
| | सहा.वाहतूक निरीक्षक | निरंक |
| | सहाय्यक | ०५ |
| | एकूण | ३२ |
| ६. | सिंधुदुर्ग विभाग | |
| | चालक | १५ |
| | कारागिर 'क' | ०१ |
| | सहा.वाहतूक निरीक्षक | ०१ |
| | सहाय्यक | ०१ |
| | एकूण | १८ |
| ७. | अकोला विभाग | |
| | चालक | १६ |
| | कारागिर 'क' | ०१ |
| | सहा.वाहतूक निरीक्षक | निरंक |
| | सहाय्यक | ०१ |
| | एकूण | १८ |
| ८. | यवतमाळ विभाग | |
| | चालक | ३९ |
| | कारागिर 'क' | ०३ |
| | सहा.वाहतूक निरीक्षक | निरंक |
| | सहाय्यक | ०१ |
| | एकूण | ४३ |
| ९. | पुणे विभाग | |
| | चालक | ५० |
| | कारागिर 'क' | ०१ |
| | सहा.वाहतूक निरीक्षक | ०० |
| | सहाय्यक | ०५ |
| | एकूण | ५६ |

## अनुसूचीत जमातीच्या उमेदवारांची एकूण संख्या

| अ. क्र. (१) | पदाचे नांव (२) | एकूण संख्या (३) |
|---|---|---|
| १. | चालक | १०१ |
| २. | कारागिर 'क' | ०६ |
| ३. | सहा.वाहतूक निरीक्षक | निरंक |
| ४. | सहाय्यक | १० |
| | एकूण | ११७ |

समितीने ९ विभागांमध्ये ४३४ पदे रिक्त आहेत. उर्वरित २१ विभागांत अनुसूचित जमातीची किती पदे रिक्त आहेत अशी विचारणा केली असता व्यवस्थापकीय संचालक यांनी परिवहन विभागाने २००८,२००९ मध्ये भरती केलेली असून, २०१० मध्ये सुद्धा भरती केली जात आहे. त्याबाबतची कार्यवाही सुरू आहे. राज्यस्तरीय जाहिरात दिल्यानुंसार मुंबई-१८, रायगड-३०, रत्नागिरी-२५, पालघर-९०, सिंधुदुर्ग-१५, धुळे-४४, नगर-०, जळगांव-०८, नाशिक-०९, पुणे-५०, सांगली-३८, सोलापूर-१०, सातारा-२२, कोल्हापूर-३६, बीड १७, परभणी-१६, उस्मानाबाद-१६, औरंगाबाद-०३, जालना-१३, नांदेड-२१, नागपूर-१६, अमरावती-१९, बुलढाणा-१९, अकोला-१६, यवतमाळ-३९, वर्धा-०७, भंडारा-१०, चंद्रपूर-२६, लातूर-० अशी अनुसूचित जमातीमध्ये जिल्हानिहाय पदे रिक्त आहेत. ही पदे भरण्याबाबतची जाहिरात दि. ५ डिसेंबर २००९ रोजीच्या 'महाराष्ट्र टाईम्स' या राज्य पातळीवरील वर्तमानपत्रामध्ये दिली होती. या पदांची लेखी परीक्षा झाली असून एस.टी.ची भरती प्रक्रिया जिल्हानिहाय केली जात आहे तसेच दिनांक ४ जून २०१० रोजी १७ हजार उमेदवारांचे निकाल वेबसाईटवर येणार आहे असे समितीला सांगितले.

### ठाणे विभाग

ठाणे विभागात अनुसूचित जमातीची एकूण ६९९ पदे मंजूर असून, २५८ पदे कार्यरत आहेत. उर्वरित ४४१ पदे रिक्त आहेत. रिक्त पदे भरण्यासाठी विभागाने काय कार्यवाही केली आहे अशी समितीने विचारणा केली असता, राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे महाव्यवस्थापक यांनी चालक पदासाठी अनुसूचित जमातीतून ८१ उमेदवारांची नियुक्ती करावयाची होती. जून, २००९ मध्ये अनुसूचित जमातीतून चालक पदी २२ उमेदवारांची निवड करण्यात आली आहे. वाहक पदासाठी अनुसूचित जमातीतून ७६ पदे भरावयाची असताना, त्यापेक्षा जास्त म्हणजेच ८४ उमेदवारांची निवड करण्यात आलेली आहे. प्रमुख कारागिर

(क) पदी एका उमेदवाराची निवड करावयाची होती व ती निवड करण्यात आली आहे. कारागिर (क) पदी ५ उमेदवारांची निवड करावयाची होती, परंतु एका पदासाठी निवड करण्यात आली आहे. सहायक पदी १२ उमेदवारांची निवड करावयाची असताना, १३ उमेदवारांची निवड करण्यात आली आहे. तसेच लिपिक पदासाठी १२ अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची निवड करण्यात आली आहे असे समितीला सांगितले.

समितीने ठाणे विभागात अनुसूचित जमातीची ४४१ पदे रिक्त असताना, केवळ १८७ पदांची जाहिरात देण्यामागील कारणे काय आहेत? अशी पुन्हा विचारणा केली त्यावर महाव्यवस्थापक यांनी एकत्रित मंजूर पदे ६९९ असून, ती वर्गनिहाय आहेत. चालक/वाहक ही पदे उत्पादकतेशी निगडित आहेत. त्यामुळे ही पदे १०० टक्के भरण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. त्यानुसार वाहक/चालक प्रवर्गातील सर्व पदे भरण्याचा विभागाने निर्णय घेतला. प्रमुख कारागिर, करागिर (क) व लिपिक टंकलेखक या प्रवर्गातील रिक्त जागांच्या ५० टक्के जागा भरण्यास शासनाने मंजुरी दिल्यानुसार, या प्रवर्गातील ५० टक्के रिक्त जागा भरण्याचा विभागाने निर्णय घेतला आहे. त्यामुळेच एकूण रिक्त जागा आणि भरण्यासाठी घोषित केलेल्या जागा यामध्ये तफावत दिसून येते. शिवाय सर्वच पदे भरल्यानंतर महामंडळाकडून सुद्धा त्यांना पगार देता आला पाहिजे. रिक्त पदाच्या ५० टक्के पदे भरण्याचा निर्णय केवळ अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी लागू नसून, सर्वच प्रवर्गासाठी लागू आहे. शिवाय अनेक वेळा आम्हाला अनुसूचित जमातीतील उमेदवार मिळत नाही. त्यामुळे प्रतिक्षा यादीवर असलेल्या अनुसूचित जमाती/जाती प्रवर्गातील उमेदवारांना नियुक्ती पत्र दिले जाते. शिवाय निवड झालेल्या उमेदवारांना सरसकट नियुक्ती पत्र दिले जात नाही. कारण एकदम सर्वांना सामावून घेतले तर, परिवहन महामंडळावर आर्थिक दडपण येईल. त्यामुळे टप्प्याटप्प्यानुसार नियुक्त्या करण्यात येतात असे समितीला सांगितले.

समितीने परिवहन विभाग/राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांच्याकडून भरती प्रक्रियेच्या वेळी राज्य पातळीवरील वर्तमानपत्रामध्ये नव्हे तर स्थानिक वर्तमानपत्रामध्ये जाहिरात दिली जाते. स्थानिक वर्तमानपत्रामध्ये जाहिरात दिल्यामुळे सर्वच ठिकाणी त्याबाबतची माहिती पोहोचत नाही. त्यामुळे अनेक पात्र उमेदवारांना भरती प्रक्रियेबाबतची माहिती मिळत नाही. परिणामी ते नोकरीपासून वंचित राहतात. अशी विचारणा केली त्यावर महाव्यवस्थापक यांनी विभागाकडून महाराष्ट्र टाईम्स या राज्य पातळीवरील वर्तमान पत्रामध्ये सुद्धा जाहिरात देण्यात आली होती. तसेच समितीने सुचविलेनुसार मराठी दुरचित्रवाणीच्या माध्यमातून जाहिरात देण्यात येईल असे समितीला सांगितले.

**पालघर विभाग**

समितीने पालघर विभागात एकूण ४९९ पदे मंजूर आहेत, त्यापैकी ३१६ कार्यरत असून १८३ पदे रिक्त होती. रिक्त पदांपैकी किती पदे भरण्यात आली आहेत अशी विचारणा केली त्यावर महाव्यवस्थापक यांनी चालकाची ६७ पदे रिक्त होती, त्यापैकी ४ उमेदवार मिळाले. उर्वरित रिक्त पदे जाहिरातीमध्ये अंतर्भूत केली आहेत. त्यानुसार पदे भरण्यात येतील असे समितीला सांगितले.

रायगड विभाग

समितीने रायगड विभागात एकूण २२८ पदे मंजूर आहेत त्यापैकी १४६ पदे कार्यरत असून ८२ पदे रिक्त आहेत. रिक्त पदांपैकी किती पदे भरण्यात आली आहेत त्याचबरोबर शाळाबाहय आदिवासींना कसे सामावून घेता येईल हे पहावे. असे विचारणा केली त्यावर महाव्यवस्थापक यांनी प्रत्येक विभागामध्ये जी जी पदे रिक्त आहेत तो संपूर्ण अनुशेष आम्ही भरून काढणार आहोत. **तसेच शाळाबाहय आदिवासींना अकुशल कामगार म्हणुन सामावून घेता येईल. असे समितीला सांगितले.**

जात वैधता प्रमाणपत्र ज्यांनी सादर केलेले नाही त्यांच्यावर तातडीने कारवाई करावी अशी समितीने अनेकदा शिफारस केलेली आहे. ज्यांनी वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही त्यांना सेवेतून बडतर्फ करणे आवश्यक आहे. वैधता प्रमाणपत्र सादर न करणाऱ्यांना सेवेतून बडतर्फ केले गेले तर तेवढी पदे रिक्त होऊन आदिवासी उमेदवारांना न्याय मिळू शकतो. अशी समितीने विचारणा केली असता, महाव्यवस्थापक यांनी समितीच्या शिफारशीनुसार आम्ही धोरणात्मक निर्णय घेतला आहे. **१९९५ नंतर जे सेवेत आलेले आहेत आणि ज्यांनी वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही त्यांना तीन महिन्यांची नोटीस देऊन त्यांच्यविरुद्ध कारवाई करीत आहोत.** परंतु आता सेवेत घेतानाच वैधता प्रमाणपत्र असल्याशिवाय निवड केली जात नाही.

१९९५ नंतर सेवेत आलेल्यांपैकी मुंबई विभागात ४ कर्मचारी होते, १९९५ पूर्वीचे ४५ आहेत. या ४ पैकी ३ कर्मचाऱ्यांची सेवा समाप्त करण्यात आली आहे. ठाणे विभागात २७ कर्मचारी हे १९९५ पूर्वी सेवेत आलेले आहेत. १९९५ पूर्वी जे सेवेत आलेले आहेत त्यांना शासनाने अभय दिले आहे. परंतु वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास अशाप्रकरणी संबंधितांना पदावनत केले आहे असे समितीला सांगितले.

**रत्नागिरी, सिंधुदुर्ग, अकोला, यवतमाळ व पुणे या प्रादेशिक कार्यालयात अनुसूचित** जमातीच्या उमेदवारासाठी सरळसेवाद्वारे राखीव असलेली व भरण्यात येणारी रिक्त पदे स्थानिक जिल्हा वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तात्काळ भरण्यात येतील. तसेच ज्या जिल्ह्यात अनुसूचित जमातीचे उमेदवार उपलब्ध न झाल्यास अन्य आदिवासी बहुल जिल्ह्यातील प्रकल्प अधिकाऱ्यांकडून उमेदवारांची यादी प्राप्त करून घेण्यात येईल व त्याप्रमाणे भरती प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. असे संबंधित प्रादेशिक कार्यालयातील अधिकाऱ्यांनी समितीला सांगितले. तसेच अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची नियुक्त पत्र देताना त्यांनी जातवैधता पडताळणी समितीकडून प्रमाणपत्र प्राप्त करून घेतले आहेत काय, याबाबतची तपासणी करूनच संबंधित उमेदवारांना नियुक्ती पत्र देण्याची कार्यवाही करण्यात येईल असे समितीला सांगितले.

तसेच पदोन्नतीने पदे भरताना अनुसूचित जमातीच्या उमेदवारांकडून जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करून घेऊन नंतरच पदोन्नतीची कार्यवाही करण्यात यावी. जे कर्मचारी जातवैधता प्रमाणपत्र दिलेल्या वेळेत सादर करणार नाहीत त्यांच्यावर शासन निर्णयाप्रमाणे कारवाई करावी असे समितीने निदेश दिले.

अभिप्राय व शिफारशी :

अनुसूचित जमाती कल्याण समितीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या प्रादेशिक कार्यालयात व मध्यवर्ती कार्यालय, मुंबई सेंट्रल (मुंबई) येथे बैठका घेऊन या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचाऱ्यांचे आरक्षण, भरती, बढती, पदोन्नती, अनुशेष व जात पडताळणी इत्यादी बाबींवर प्रत्यक्ष भेटीच्या वेळी आढळून आलेल्या त्रुटीच्या संदर्भात व विभागीय सचिवांच्या साक्षीच्या बैठकीत समितीला पुरविण्यात आलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने खालील प्रमाणे शिफारसी सुचविलेल्या आहेत.

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ या कार्यालयात डिसेंबर, २००८ पर्यंत अनुसूचित जमातीच्या रिक्त असलेल्या व जून, २००९ मध्ये निवड केलेल्या अनुसूचित जमातीची पदे भरण्याबाबत दिलेल्या तपशीलानुसार, ९ विभागामध्ये एकुण ११३६ पदे रिक्त आहेत यापैकी सरळसेवा भरतीद्वारे जून, २००९ मध्ये निवड करण्यात आलेल्या अनुसूचित जमातीच्या उमेदवाराची संख्या ९ विभागामध्ये एकूण ३०१ आहे. म्हणजेच अद्याप पर्यंत अनुसूचित जमातीची एकूण ८३५ पदे रिक्त असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. **समितीने जून, २००९ मध्ये निवड केलेल्या नऊ विभागातील एकूण ३०१ अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची जात वैधता प्रमाणपत्र समिती कडून जात पडताळणी करुन किती उमेदवारांची महामंडळाच्या कार्यालयात नियुक्ती करण्यात आली आहे याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा. अशी समितीची शिफारस आहे.**

तसेच एस. टी. महामंडळाच्या नऊ विभागातील (प्रादेशिक कार्यालयसह) अनुसूचित जमाती उमेदवारासाठी राखीव असलेल्या, **उर्वरित एकूण ८३५ रिक्त पदांची महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून लवकरात लवकर भरती करणेबाबत महामंडळाने कोणती कार्यवाही केलेली आहे व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा. अशी समितीची शिफारस आहे.**

(२) अनुसूचीत जमातीच्या वर्ग ३ घटकसंवर्गातील पदोन्नतीसाठी रिक्त असलेल्या ७ विभागातील एकूण १०९ पदापैकी यवतमाळ विभागातील ४ कर्मचाऱ्यांना सन २००८ मध्ये पदोन्नती देण्यात आली आहे. तसेच पूणे विभागातील पदोन्नतीच्या रिक्त असलेल्या ६ पदांऐवजी ९ कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली आहे. उर्वरित कर्मचाऱ्यांची पदोन्नती बढती परिक्षा आयोजित करणे, जागा उपलब्ध होताच पदोन्नती देणे, पदोन्नतीची कार्यवाही सुरू आहे अशा कारणांनी प्रलंबित असल्याचे समितीच्या निदर्शनास आले, **पदोन्नती देण्यात येत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या प्रकरणी महामंडळाच्या संबंधित प्रादेशिक कार्यालयाने त्वरीत निर्णय घेऊन अशा कर्मचाऱ्यांना पदोन्नती देतांना अनुसूचित जमातीच्या कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच त्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याची कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा. अशी समितीची शिफारस आहे.**

(३) राज्य परिवहन महामंडळाच्या ९ प्रादेशिक विभागातील कर्मचाऱ्यांचे जात पडताळणी समितीकडे प्रलंबित असलेल्या एकूण १७६ प्रकरणी महामंडळाच्या संबंधित प्रादेशिक कार्यालयातील अधिकाऱ्यांनी पाठपुरावा करून **संबधित जात पडताळणी समितीकडून जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करण्याची कार्यवाही करण्यात यावी तसेच विभागातील जे अनुसूचित जमातीचे अधिकारी व कर्मचारी जात पडताळणीसाठी आवश्यक असणारी कागदपत्रे कार्यालयात सादर करीत नाहीत किंवा ज्यांची जात प्रमाणपत्रे अवैध ठरली आहेत त्यांच्याबाबत परिपत्रक क्रमांक २९१० दिनांक १५ जुलै, २००९ अन्वये (पृष्ठ क्र.२४) दिलेल्या सुचना प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा. अशी समितीची शिफारस आहे.**

(४) राज्य परिवहन महामंडळा अंतर्गत असलेल्या प्रादेशिक कार्यालयातील भरती प्रक्रिया केंद्रीय पध्दतीने करण्याची कार्यवाही करण्यात येते असे समितीला प्रादेशिक कार्यालयात दिलेल्या भेटीच्या व बैठकीच्या वेळी निदर्शनास आले आहे. **त्यामुळे जिल्ह्यातील आदिवासी उमेदवारांवर अन्याय होतो व त्या त्या प्रादेशिक कार्यालयात अनुशेष शिल्लक राहतो. त्यामुळे एस.टी. महामंडळाकडून जिल्हानिहाय भरती प्रक्रिया सुरू करण्याची कार्यवाही त्वरीत करण्यात यावी, जेणे करून खऱ्या अर्थाने स्थानिक आदिवासी उमेदवारांना न्याय मिळेल अशा प्रकारे कार्यवाही करून केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा. अशी समितीची शिफारस आहे.**

(५) अनुसूचित जाती/जमाती इत्यादी प्रवर्गाचे लोक ज्या जिल्ह्यात मोठया संख्येच्या प्रमाणात आहेत तेथे त्याच प्रवर्गाच्या उमेदवारांची भरती झाली पाहिजे. समितीला जिल्ह्यातील भेटीच्यावेळी ज्या जिल्ह्यात आदिवासी जमातीचे लोक जास्त प्रमाणात आहे तेथे अन्य जिल्ह्यातील उमेदवारांची भरती केली जाते **त्यामुळे आदिवासी उमेदवारांसाठी राखीव असलेल्या जागेवर त्याच जिल्ह्यातील आदिवासी उमेदवारांची नेमणूक करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा. अशी समितीची शिफारस आहे.**

(६) राज्यातील आदिवासी उपाययोजना क्षेत्रात आदिवासी भागातील लोक किंवा या प्रवर्गात मोडणाऱ्या समाजातील लोक वाहन चालकाचे प्रशिक्षण घेऊ शकतात. परंतू आदिवासी उपाययोजना बाह्य क्षेत्रात आदिवासी जमातीची संख्या कमी असल्याने व त्यांना प्रशिक्षण मिळण्याची सोय नसल्यामुळे ते वाहन चालक होऊ शकत नाहीत. पांढरकवडा व गडचिरोली या दोन ठिकाणी चालकाचे प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आले होते . त्याठिकाणी वसतीगृहाची सोय केलेली होती. प्रशिक्षणार्थीचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांना महामंडळाच्या सेवेत घेण्याची व्यवस्था करण्यात आली होती. त्याचप्रकारे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने तयार केलेल्या नविन योजनेनुसार **अचलपूर, परतवाडा आणि ठाणे जिल्ह्यामध्ये चालकाचे प्रशिक्षण केंद्र सुरू करणेबाबत शासनाकडे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावास परिवहन विभागाकडून तातडीने मंजूरी देण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा. अशी समितीची शिफारस आहे.**

(७) वरील प्रमाणे वाहन चालकांची प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यास मान्यता देत असतांना मराठवाडा विभागातील बीड, जालना, उस्मानाबाद या ठिकाणी सुध्दा चालकाची प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याचा प्रस्ताव एस.टी. महामंडळाकडून तयार करण्यात येऊन संबंधित विभागाकडे मंजूरीसाठी सादर करण्यात यावा, तसेच विशेष बाब म्हणून प्रथम बीड येथे चालक प्रशिक्षण केंद्र सुरू होणेबाबत परिवहन विभागाने सादर केलेल्या प्रस्तावास मंजुरी मिळण्याच्या दृष्टीने तातडीने कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे..

तसेच अशी प्रशिक्षण केंद्र सुरू करीत असताना आदिवासी विकास विभागाचा निधी खर्च न झाल्यामुळे वारंवार समर्पित करावा लागतो त्यामुळे सुरू करण्यात येणाऱ्या प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षणार्थ्यांना देण्यात येणाऱ्या मानधनाचा आर्थिक भार आदिवासी विकास विभागाकडून मंजूर करून घेणेबाबत कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा. अशी ही समिति शिफारस करीत आहे.

(८) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील वाहक, चालक यांना प्रशिक्षण देण्याबरोबर, टर्नर, फिटर, वेल्डर या तांत्रिक पदावर नोकरी मिळण्यासाठी अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना प्रशिक्षण देणे आवश्यक आहे कारण आदिवासी जमातीचे लोक अप्रशिक्षित असल्यामुळे त्यांना अशा पदावर नोकरी मिळत नाही. शिक्षण विभागामध्ये अप्रशिक्षित शिक्षक चालु शकतात तर आदिवासी समाजातील अप्रशिक्षित उमेदवारांना विविध डेपो मधून प्रशिक्षण दिले तर अनुसूचित जमातीच्या जागा भरल्या जातील, अशा प्रकरची योजना राज्य मार्ग परिवहन महामंडळाने तयार करून आदिवासी उपाययोजना क्षेत्रातंर्गत व बाह्य क्षेत्रातंर्गत राबविण्यात यावी जेणे करून त्या क्षेत्रातील आदिवासी जमातीच्या उमेदवाराना त्याचा लाभ घेता येईल अशी समितीची शिफारस आहे.

तसेच आय.टी.आय. बाह्य किंवा शाळाबाह्य असलेल्या आदिवासी उमेदवारांना प्रथम विविध डेपोच्या माध्यमातून प्रशिक्षण देण्याची योजना एस.टी. महामंडळामार्फत तातडीने तयार करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा. अशी समितीची शिफारस आहे.

(९) एस.टी. महामंडळाच्या नऊ विभागात अनुसुचित जमातीचा जिल्हानिहाय ४३४ पदांचा अनुशेष दाखविण्यात आलेला आहे तसेच उर्वरित जिल्ह्यात अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी असलेली जिल्हानिहाय एकूण ६२४ पदे अनुशेष अभावी रिक्त आहेत. रिक्त असलेली सर्व पदे राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून तातडीने भरती करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा. अशी समितीची शिफारस आहे.

(१०) बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यात मंच्छिंद्र नाथांचे जागृत देवस्थान आहे. या ठिकाणी मुंबई व पुण्यावरुन हजारो यात्रेकरु दर्शनासाठी येत असतात त्यामुळे मंच्छिद्रनाथ ते मुंबई व्हाया पुणे अशी व्हाल्व्हो किंवा शिवनेरीची बस सुरू केली तर प्रवाशांनाही ते सोयीचे होईल व परिवहन विभागाचेही उत्पन्न वाढू शकेल. या मार्गावर आता ज्या बसेस सुरू आहेत त्यांची अवस्था काही चांगली नाही.

तसेच या देवस्थानालगत बस थांबविण्यासाठी जागा उपलब्ध असून त्या ठिकाणी जेवणाची सुध्दा चांगली व्यवस्था आहे. अशा ठिकाणी बससेवा सुरू करावी अशी मा. समितीप्रमुख यांनी सुचना केली. परिवहन सचिव यांनी समितीने जी सूचना केलेली आहे त्या सूचनेचा नक्की विचार करण्यात येईल यासंदर्भात लवकरच माहिती घेऊन या मार्गाचा रुट काढण्यात येईल. एक दोन दिवस या मार्गावरुन बस चालवून पाहू व नंतर ही बस नियमित ठेवावयाची की नाही याबाबत निर्णय घेऊ असे समितीला आश्वासित केले. **सचिव, परिवहन विभाग यांनी समितीला दिलेल्या आश्वासनांनुसार मंच्छिंद्रनाथ ते मुंबई व्हाया पूणे अशी व्हॉल्व्हो किंवा शिवनेरी बस सेवा तातडीने सरू करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे .**

(११) तसेच समिती आदिवासी समाजाबद्दल सहानुभूतीने विचार करीत असुन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन **महामंडळाने बस डेपोच्या ठिकाणी गाळे विक्री करीत असतांना ते आदिवासी समाजासाठी राखून ठेऊन त्यांना उपलब्ध करून दिल्यास महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून आदिवासी विकास महामंडळाचा सोर्स ऑफ इन्कम तयार होईल व आदिवासी समाजाला न्याय मिळू शकेल या दृष्टिने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा. अशी समिती शिफारस करीत आहे.**

**समितीने वरीलप्रमाणे सुचविलेल्या सर्व शिफारशीवर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून व परिवहन विभागाकडून लवकरात लवकर कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे .**

# परिशिष्ट

## (समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त)

## पहिली बैठक

मंगळवार, दिनांक २७ जानेवारी, २००९

समितीची बैठक महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, प्रादेशिक कार्यालय, अकोला येथे झाली. सदरहू बैठकीस खालील सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

### उपस्थिती

**समिती प्रमुख :**

१. श्री. महादु बरोरा, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य :**

२. श्री. तुकाराम बिरकड, वि.स.स.

३. श्री. सुरेश इंगळे, वि.स.स.

४. श्री. बाळा नांदगावकर, वि.स.स.

५. डॉ. संदीप धुर्वे, वि.स.स.

६. श्री. राजकुमार पटेल, वि.स.स.

७. श्री. दिलीपराव सोनवणे, वि.प.स.

८. श्री. परशुराम उपरकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. ए. आर. पिंपळे, अवर सचिव.

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, प्रादेशिक कार्यालय अकोला :**

१. श्री. एन. एम. सुर्यवंशी, प्रादेशिक अभियंता, राज्य परिवहन महामंडळ, अमरावती.

२. श्री. सी. आर. बोरसे, विभागीय नियंत्रक, अकोला.

३. श्री. पळसपगार, वरिष्ठ लिपिक.

**आदिवासी विकास विभाग :**

१. श्री. जी. पी. गरड, अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती.

२. श्री. व्ही. बी. गिरी, प्रकल्प अधिकारी, अकोला.

**मागासवर्गीय कक्ष, आयुक्त कार्यालय, अमरावती :**

श्री. डी. जी. चांडोळे, नायब तहसीलदार, (मावक).

समितीने या बैठकीत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ प्रादेशिक कार्यालय अकोला येथे भेट दिली या कार्यालयातील अनुसूचित, जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांच्या सरळसेवा भरती, बढती, आरक्षण व अनुशेष याबाबत तसेच आदिवासी जमाती करीता राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबत आढावा घेण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करून माहिती घेतली.

## दुसरी बैठक

शुक्रवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २००९

समितीची बैठक महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, प्रादेशिक कार्यालय, कुर्ला (मुंबई) येथे झाली. सदरहू बैठकीस खालील सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

### उपस्थिती

**समिती प्रमुख :**

१. श्री. परशुराम उपरकर, वि.प.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख

**सदस्य :**

२. श्री. सुरेश इंगळे, वि.स.स.

३. श्री. बाळा नांदगांवकर, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

१. श्री. प्रा. नि. मिसाळ, उप सचिव.

२. एल. एन. जाधव, समिती अधिकारी.

**आदिवासी प्रकल्प अधिकारी, बोरीवली**

श्री. एन. एच. वाडू, प्रकल्प अधिकारी,

आयुक्त कार्यालय, कोकण विभाग.

१. श्री. एस. बी. पाटील, सहाय्यक आयुक्त.

२. श्री. विश्वनाथ वेटकोळे,

नायब तहसीलदार (मावक)

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, प्रादेशिक कार्यालय, कुर्ला (मुंबई) :**

१. कॅप्टन आर. आर. पाटील, प्रादेशिक व्यवस्थापक, मुंबई प्रदेश.

२. श्री. जे. पी. चव्हाण, प्रादेशिक अभियंता, मुंबई प्रदेश.

३. श्री. एस. डी. माईनहळ्ळीकर, विभाग नियंत्रक , मुबई विभाग.

४. श्री. डी. आर थोरात, विभाग नियंत्रक, पालघर विभाग.

५. श्री. जे. पी.कदम, विभाग नियंत्रक, रायगड विभाग.

६. श्री. एम. बी. पठरी, विभाग नियंत्रक, रत्नागिरी विभाग.

७. श्री. डी. एम. कदम, विभाग नियंत्रक, सिंधुदुर्ग विभाग.

८. श्री. पी. एस. सावंत, विभाग नियंत्रक, ठाणे विभाग.

९. श्री. ए. व्ही. गाडे, सहायक कर्मचारी वर्ग अधिकारी मध्यवर्ती कार्यालय, मुंबई.

१०. श्री. जावळे, विभागीय कर्मचारी अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, मुंबई.

समितीने या बैठकीत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, प्रादेशिक कार्यालय (कुर्ला), मुंबई येथे भेट दिली या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांच्या सरळसेवा भरती, बढती, आरक्षण व अनुशेष याबाबत तसेच आदिवासी जमातीकरिता राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबत आढावा घेण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करून माहिती घेतली.

## तिसरी बैठक

### सोमवार, दिनांक २ मार्च २००९

समितीची बैठक राज्य मार्ग परिवहन महामंडळ, प्रादेशिक कार्यालय, यवतमाळ येथे झाली, सदरहू बैठकीस खालील सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

### उपस्थिती

समिती प्रमुख

१. डॉ. संदीप धुर्वे, वि.स.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख

सदस्य :

२. श्री. सुरेश इंगळे, वि.स.स.

३. श्री. बाळा नांदगांवकर, वि.स.स.

४. श्री. दिलीपराव सोनवणे, वि.प.स.

५. श्री. परशुराम उपरकर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :
श्री.एल.एन.जाधव, समिती अधिकारी.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, प्रादेशिक कार्यालय, यवतमाळ

१. श्री. डब्ल्यू जी. टेकाम, प्रादेशिक व्यवस्थापक, अमरावती

२. श्री. सुधीर पंचभाई, विभागीय नियंत्रक, एस.टी.महामंडळ

३. श्री. संजय नेरकर, डिव्हिजनल पर्सोनेल ऑफिसर

आदिवासी विकास विभाग

श्री. जी. पी. गरड, अपर आयुक्त अमरावती

श्री. सारंग कोडोलकर, प्रकल्प अधिकारी

विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती

श्री. डी. जी. चांदोले, नायब तहसीलदार

मागासवर्गीय कक्ष.

समितीने या बैठकीत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ प्रादेशिक कार्यालय, यवतमाळ येथे भेट दिली या कार्यालयातील अनुसूचित, जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांच्या सरळसेवा भरती, बढती, आरक्षण व अनुशेष याबाबत तसेच आदिवासी जमातीकरिता राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबत आढावा घेण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करून माहिती घेतली.

## चौथी बैठक

गुरुवार, दिनांक २५ जून २००९

समितीची बैठक महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई सेंट्रल येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालील सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

## उपस्थिती

**समिती प्रमुख**

१. श्री. म.ना.बरोरा, वि.स.स तथा समिती प्रमुख

**सदस्य :**

२. श्री. सुरेश इंगळे, वि.स.स.

३. डॉ. संदीप धुर्वे, वि.स.स.

४. श्री. राजकुमार पटेल, वि.स.स.

५. श्री. दिलीपराव सोनवणे, वि.प.स.

६. श्री. परशुराम उपरकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. ला.ना.जाधव, समिती अधिकारी.

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई**

श्री. भा. ल. राठोड, प्रभारी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

श्री. रविंद्र कदम, महाव्यवस्थापक (क.व.औ.सं.)

श्री. इ. एस. परब, मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी

श्री. सुभाष ठाकरे, कर्मचारीवर्ग अधिकारी

श्री. आनंद गाडे, सहा. कर्मचारीवर्ग अधिकारी

श्री. एम. एम. वाड, प्रकल्प अधिकारी, मुंबई

**अपर आयुक्त आदिवासी विकास, ठाणे**

श्री. पांडुरंग द. करवंदे, अपर आयुक्त

**विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग**

श्री. मनोज रानडे, सहा. आयुक्त(मा.व.क.)

समितीने या बैठकीत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ मध्यवर्ती कार्यालय,. मुंबई सेंट्रल येथे भेट दिली या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांच्या सरळसेवा भरती, बढती, आरक्षण व अनुशेष याबाबत तसेच आदिवासी जमातीकरिता राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबत आढावा घेण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करून माहिती घेतली.

## पाचवी बैठक

गुरुवार, दिनांक २ जुलै २००९

समितीची बैठक महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, पुणे प्रादेशिक कार्यालयात झाली. सदरहू बैठकीस खालील सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

## उपस्थिती

**समिती प्रमुख**

१. श्री. म.ना.बरोरा, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य :**

२. श्री. सुरेश इंगळे, वि.स.स.

३. श्री. राजकुमार पटेल, वि.स.स.

४. श्री. एम.एम.शेख, वि.प.स.

५. श्री. दिलीपराव सोनवणे, वि.प.स.

६. श्री. परशुराम उपरकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

१. श्री. म. मु. काज, उप सचिव

२. श्री. एल. एन. जाधव, समिती अधिकारी.

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, प्रादेशिक कार्यालय, पुणे**

१. श्री. राजेंद्र पाटील, प्रादेशिक व्यवस्थापक

२. श्री. शिवाजीराव सोनावणे, विभागीय नियंत्रक

३. श्री. द. स. पंचवाघ, कर्मचारी वर्ग अधिकारी

**विभागीय आयुक्त कार्यालय**

श्रीमती स्नेहल बर्वे, सहाय्यक आयुक्त, मागासवर्गीय कक्ष

**आदिवासी विकास विभाग**

श्री. लोभेश सलामे, प्रकल्प अधिकारी

समितीने या बैठकीत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ प्रादेशिक कार्यालय, पुणे येथे भेट दिली या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांच्या सरळसेवा भरती, बढती, आरक्षण व अनुशेष याबाबत तसेच आदिवासी जमातीकरिता राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबत आढावा घेण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करून माहिती घेतली.

## सहावी बैठक

गुरुवार, दिनांक ३ जून २०१०

समितीची बैठक विधानभवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता घेण्यात आली होती. सदरहू बैठकीस पुढील सदस्य उपस्थित होते :-

### उपस्थिती

समिती प्रमुख

१. श्री. सुरेश धस, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य :

२. श्रीमती निर्मला गावित, वि.स.स.
३. श्री. जगदीशचंद्र वळवी, वि.स.स.
४. श्री. उमाजी बोरसे, वि.स.स.
५. ॲड. चिंतामण वनगा, वि.स.स.
६. श्री. दौलत दरोडा, वि.स.स.
७. श्री. धनराज महाले, वि.स.स.
८. श्री. रमेश शेंडगे, वि.प.स.
९. श्री. परशुराम उपरकर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

१. श्री. म. मु. काज, उप सचिव
२. श्री. ला. ना. जाधव, अवर सचिव (समिती).

ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय

१. श्री.सुधीर ठाकरे, प्रधान सचिव

गृह (परिवहन) विभाग, मंत्रालय व राज्य परिवहन महामंडळ

१. श्री. सी. एस. संगीतराव, सचिव (परिवहन)
२. श्री. दीपक कपूर, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक (एस.टी.)
३. श्री. जे. एम. चव्हाण, उप सचिव (परिवहन)
४.

समितीने या बैठकीत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष इत्यादी बाबत विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

## सातवी बैठक

समितीची बैठक सोमवार दिनांक, १९ जुलै २०१० रोजी दुपारी ३.०० वाजता विधानभवन, मुंबई येथे घेण्यात आली सदरहू बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थिती

१. श्री. सुरेश धस, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री. जगदीशचंद्र वळवी, वि.स.स.

३. श्री. उमाजी बोरसे, वि.स.स.

४. ॲड. चिंतामण वनगा, वि.स.स.

५. श्री. दौलत दरोड, वि.स.स.

६. श्री. रमेश शेंडगे, वि.प.स.

७. श्री. परशुराम उपरकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

१. श्री. म. मु. काज, उप सचिव

२. श्री. ला. ना. जाधव, अवर सचिव (समिती).

समितीने या बैठकीत प्रारूप अहवालावर विचार केला व तो संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई